# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १९ मार्च, २०१५ / फाल्गुन २८, १९३६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण,क्रिडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९९**

---

**राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयाच्या सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राहय धरुन इतर सर्व अनुषंगिक लाभ देणेबाबत**

**(१) * ३७४९ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक १७१० ला दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात सन १९९१ ते मार्च, २००० या कालावधीत सेवेत आलेल्या बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा ग्राहय धरुन त्यांना इतर सर्व अनुषंगिक लाभ देणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार शासनस्तरावरुन फक्त याचिकाकर्त्यांना सेवाविषयक बाबींचे सर्व लाभ देण्यात यावेत असा आदेश निर्गमित झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याचिकाकर्त्या अधिव्याख्यातांना शासन आदेशानुसार वेतन निश्चितीचे लाभ व सेवा ग्राहय धरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे काय,

(३) सन १९९१ ते मार्च, २००० या कालावधीतील उर्वरित बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत सेवा ग्राहय धरुन अनुषंगिक लाभ देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय. हे खरे आहे.

(२) कार्यवाही सुरु आहे.

(३) या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे विशेष अनुमती याचिका क्र.३४११८/२०१३ दाखल करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित**
**शाळेतील शिक्षकांच्या आर्थिक शोषणाबाबत**

**(२) * ३२६३ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक शिक्षकेतरांना अनुदानित शाळांप्रमाणे वेतन देणे, नियुक्त्या करणे, प्रशिक्षित शिक्षक नेमणे, संच मान्यता व कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता घेणे संबंधित शाळांवर बंधनकारक आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतेक शाळांमध्ये या अटीचे पालन होत नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांच्या नियुक्यांना मान्यता नसलेले शिक्षकही १० वी व १२ वीचे पेपर तपासण्याचे काम करतात हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्यध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ जूलै, २०१४ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) निवेदन आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नगरपालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या शाळांना वेतन वेळेवर मिळत नसल्याबाबत**

**(३) * २८७५ डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपालिका क्षेत्रांतर्गत असलेल्या शाळांना वेतन वेळेवर मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शाळा शासनाकडे वर्ग करण्याविषयी शासनाचे धोरण काय आहे,

(३) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील नादुरुस्त**
**डायलिसीस मशीन दुरुस्त करण्याबाबत**

**(४) * ४१२९ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील अतिविशेषोपचार रुग्णालयातील नऊ पैकी पाच मशिन बंद पडल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, किडनी आजारात जीवनदायी असणाऱ्या केवळ चार डायलिसिस मशिनवर भार पडत असून रुग्णांना डायलिसिससाठी प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही रुग्णांचे आठवड्यातून दोन ते तीन वेळा हिमोडायलिसिस करावे लागते व त्यात रुग्णांची संख्या वाढल्याने गरीब रुग्णालयांना खाजगी रुग्णालयात जावे लागत असून तेथील दर त्यांना परवडत नसल्याने डायलिसिस अभावी रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार सदर रुग्णालयातील नादुरुस्त डायलिसिस मशीन्स त्वरीत दुरूस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
संस्थेमध्ये उर्वरीत चार यंत्रावर रुग्णांना डायलेसिस देण्यात येते. त्यामुळे रुग्णांना डायलिसिससाठी प्रतिक्षा करावी लागत नाही.
(३) हे खरे नाही.
(४) नादुरुस्त यंत्राचे आयुष्यमान संपल्यामुळे संस्थेकडून केलेल्या मागणीनुसार शासनाने शा.नि.क्र.: खरेदी-२०१४/प्र.क्र.४०३/१४ प्रशा-१, दि.१.१०.२०१४ अन्वये ३ हिमोडायलिसीस यंत्रे खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे संचालनालय स्तरावर ३ नविन यंत्राच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कला, क्रीडा, संगित शिक्षकांच्या नेमणुका अर्धवेळ केल्यामुळे निर्माण झालेला असंतोष**

**(५) * ३३६८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कला, क्रीडा, संगित शिक्षकांच्या नेमणुका अर्धवेळ केल्यामुळे विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे एकाचवेळी नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शिक्षणाच्या कायद्यात सुधारणा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या थकीत भाडयाची रक्कम मिळण्याबाबत**

**(६) * ३६५८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा परिषद संचलित प्राथमिक शाळांचे भाडे सन २००८ पासून थकलेले आहे, थकीत रक्कम रु.९१ लक्षची मागणी शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे दिनांक १९ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्षानुवर्षे इमारत भाडे न मिळाल्यामुळे इमारत मालकांनी शाळेला कुलूप लावण्याचा इशाराही दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी शिक्षण संचालक, पुणे यांना दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे इमारत भाडे अदा करण्यासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय

(२) होय

(३) मा.लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या निवेदनाबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा.लोकप्रतिनिधींनी दि.२०/०१/२०१५ अन्वये उत्तर दिले आहे.

(४) जिल्हा परिषद बीड कार्यालयाकडे असलेली अखर्चीत रक्कम शासनाकडे भरणा झालेली नाही. त्यामुळे इमारत भाड्याची रक्कम मंजूर करता येत नाही.

-----------------

**पुर्णवेळ निदेशकांना पुर्णवेळ शिक्षकांप्रमाणे वेतन श्रेणीतील ग्रेड-पे मिळणेबाबत**

**(७) * ३५४८ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९८८ पासून राज्यातील १३२९ संस्थामधून +२ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम (former mcvc) शिकविण्यासाठी निदेशकांची पदे निर्माण करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुर्णवेळ शिक्षक व पुर्णवेळ निदेशक यांचे शैक्षणिक कार्य एकाच स्वरुपाचे असताना पूर्णवेळ निदेशकांना पूर्णवेळ शिक्षकांपेक्षा वेतनश्रेणीत कमी पे ग्रेड देण्यात येत असल्याच्या तक्रारी-निवेदने संबंधित पूर्णवेळ निदेशक व त्यांच्या संघटनांनी माहे जून, २०१४ मध्ये संचालक, व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण तसेच प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय व तत्कालिन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक १२ जुलै, २०१४ रोजी व माहे डिसेंबर, २०१४ मध्ये सादर केली आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, त्याचे कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) शासन स्तरावर स्वतंत्र समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला, तथापि संचालनालय स्तरावरुन शाळा संहिता तयार करण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याने स्वतंत्र समिती अद्याप नेमण्यात आली नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या प्रलंबित माग्ण्यांबाबत**

**(८) * ३५८१ श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.रामराव वडकुते, श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चिपळूणकर समितीच्या शिफारशींप्रमाणे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करावीत, शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्याची प्रक्रिया कायमस्वरुपी बंद करावी, माध्यमिक शाळांना २००४ पासून वेतनेत्तर अनुदान देणे, केंद्र सरकारच्या राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व सर्व शिक्षा अभियानाचा निधी खासगी माध्यमिक शाळांनाही द्यावा, १ ली ते ५ वी आणि ६ वी ते ८ वी वर्गाला स्वतंत्र मुख्याध्यापक द्यावा, या सारख्या अनेक

मागण्यांसाठी राज्यभरातील शिक्षक संघटनांनी येत्या १३ जानेवारी, २०१५ रोजी एक दिवसीय शाळा बंद आंदोलनाचा इशारा दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) महाराष्ट्र राज्य शिक्षण क्षेत्र संघटना समन्वय समिती यांच्या दि.१३.१.२०१५ च्या निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने काही बाबी धोरणात्मक स्वरुपाच्या आहेत. याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिटी इंटरनॅशनल स्कूल वानवाडी (जि.पुणे) शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत**

**(९) * ३७०५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील वानवाडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी नेमलेल्या समितीने शाळेला जबाबदार धरुन सदर शाळेची मान्यता रद्द करण्याची शिफारस माहे डिसेंबर, २०१४ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर समिती वारजे व एरंडवणे या भागातील नामांकित शाळांमध्ये झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी सखोल चौकशी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) उपरोक्त प्रकरणांमध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुणे यांच्या कार्यालयाकडे RTE २००९ मधील कलम १२ (ख) नुसार नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झालेला असून त्यानुषंगाने दोषीवर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खरेदी करारात दाखविलेल्या क्षेत्रफळापेक्षा कमी क्षेत्रफळाच्या सदनिका विकून ग्राहकांची फसवणूक करणा-या बिल्डरांवर कारवाई करण्याबाबत**

**(१०) * ३८१० श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड येथील पूर्वाचल सहकारी गृहनिर्माण संस्था या पुर्नरचित इमारतीतील सदनिकांचे क्षेत्रफळ कमी असतांना ही इमारत बांधणा-या कमलनाथ युनिव्हर्सल कंपनीने सदनिकेचे जादा क्षेत्रफळ दाखवून फसवणूक केल्याचे वैधमापन विभागाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अनुषंगाने वैधमापन विभागाकडून संबंधित इमारत बांधणाऱ्या विकासकांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

मे. कमलनाथ युनिव्हर्सल प्रा. लिमिटेड या विकासकाविरुध्द निरीक्षक, वैध मापन शास्त्र, मुलूंड विभाग यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी सदर सदनिका जप्त करुन वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ चे कलम ११ व ३० च्या भंगाबाबत खटला नोंदविला आहे. सदरील प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

**गुलशन-ए-हाफीजा उर्दु शाळा, पिंपळगांव राजा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) संस्थेच्या कागदपत्रांची छाननी करण्याबाबत**

**(११) * ४०४० श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुलशन-ए-हाफीजा उर्दु शाळा पिंपळगांव राजा, ता.खामगांव, जि.बुलढाणा या संस्थेला शासनाने माहे जून, २००३ पासून शाळा सुरू करण्याची परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नियम व अटी क्र.१ प्रमाणे संस्था अधिनियम १९५० प्रमाणे दिनांक १ जुलै, २००३ रोजी नोंदणीकृत झालेली नव्हती हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्यावेळेस परवानगी देण्यात आली त्यावेळेस अटी व शर्ती प्रमाणे शासनाने मागील किमान दोन वर्षात सनदी लेखापालामार्फत लेखा परिक्षण करून घेतले होते काय,

(४) नसल्यास, या शाळेला परवानगी देत असताना कुठल्याही प्रकारच्या कागदपत्रांची पुर्तता न करताच दिलेली शासन परवानगी रद्द करणार आहात काय,

(५) गुलशन-ए-हफिजा ऊर्दू प्राथमिक शाळा पिंपळगांव राजा, ता.खामगांव, जि.बुलढाणा या शाळेची खाते मान्यता व शाळेची परवानगी रद्द करण्याबाबत श्री.शकील अहमद खान, पी.राजा यांनी अप्पर मुख्य सचिव शालेय शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार दाखल केली हे खरे आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय, तथापि, नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा अधिनियम, २१) नुसार ही संस्था दि. ९.५.२००३ रोजी नोंदणीकृत झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) उपलब्ध अभिलेखात सदर तक्रार अर्ज आढळून आलेला नाही.

-----------------

## राज्यात बनावट औषधांची होत असलेली विक्री

**(१२) * ३०४४ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औषध विक्री क्षेत्रात समाजकंटकाचा शिरकाव झाल्यामुळे बनावट औषधे बाजारात विक्रीसाठी येतात या औषधांमुळे रूग्णांना गुण येण्याऐवजी त्याचे दुष्परिणाम दिसून येत असल्याचे वक्तव्य अन्न व औषधे प्रशासन विभागाचे सह आयुक्त यांनी केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट औषधांचा वापर रोखणे व ग्राहकांना दर्जेदार औषधांचा पुरवठा करण्याबाबत राज्यशासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्‌याप उक्त प्रकरणी कोणतीच उपाययोजना करण्यात येत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक शाळा (नर्सरी/बालवाडी) साठी कायदा व धोरण तयार करणेबाबत

**(१३) * २८३० डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक (नर्सरी/बालवाडी) शाळातील प्रवेश व तेथे नियुक्त करावयाच्या शिक्षकांची शैक्षणिक अर्हता, सेवाशर्ती इत्यादी बाबी निश्चित करण्यासाठी गठीत समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबत धोरणनिश्चिती व कायदा तयार करण्याच्या विचाराधीन बाबीवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(२) राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे मोठया प्रमाणात फुटलेले पेव, अनेक शाळांचे संचालन, तेथील शैक्षणिक व भौतिक सुविधांचा अभाव, विभागाने मान्यता दिलेल्या व प्रत्यक्ष सुरु असलेल्या तुकडयांच्या संख्येतील मोठी तफावत, या तुकडयांवर विहीत शैक्षणिक अर्हताधारक पदवीधर शिक्षक कार्यरत नसणे, नियुक्त शिक्षकांना खात्याकडून मान्यता नसणे, इ.बाबत पालकांच्या गंभीर तक्रारी लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ चे पत्रान्वये मा.मंत्री शालेय शिक्षण यांचे निदर्शनास आणुन दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतांश इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे संचालन तेथील सुविधा, तुकड्या व शिक्षक मान्यता यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्याने इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचा गुणात्मक दर्जा खालवला असून पर्यायाने विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्नोक्त विचाराधीन बाबीवर शासनस्तरावरुन सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक शाळा (नर्सरी/बालवाडी) यांचे नियंत्रणासाठी कोणती मार्गदर्शक तत्वे विहीत करण्यात आलेली आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबत धोरणनिश्चिती व कायदा तयार करणेबाबत शासनस्तरावरुन विचार सुरु आहे.
(२), (३) व (४) नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र स्वयंसहाय्यीत शाळा अधिनियम (स्थापना व विनियमन) २०१२ अंतर्गत मान्यता देण्यात आलेली आहे. शाळा मान्यतेनंतर १८ महिन्यांमध्ये सुविधांचे पूर्तता केल्यानंतरच प्रत्यक्षात शाळा सुरु करता येते. अन्य बाबी तपासण्याच्या सूचना दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये शिक्षण संचालक प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना देण्यात आल्या आहेत.
(५) पूर्व प्राथमिक शिक्षणाबाबत धोरणनिश्चिती व कायदा तयार करणेबाबत शासनस्तरावरुन विचार सुरु आहे.

-----------------

## राज्यात महाविद्यालयीन निवडणूकांसाठी आचार संहिता बनविण्याबाबत

**(१४) * ३२९८ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाविद्यालयीन प्रतिनिधींच्या निवडणुकींना हिंसात्मक वळण येऊ लागल्याने शासनाने सन १९९२ पासून त्यावर बंदी घातली होती. आता पुन्हा महाविद्यालयीन प्रतिनिधींच्या निवडणुका घेण्यासाठी कठोर आचारसंहित बनत असून ऑन लाईन किंवा एसएमएस द्वारे निवडणूका घेतल्या जाणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन सदर निवडणूकांसाठी आचार संहिता बनविण्याचे काम सुरू केले आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय,

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) विचार प्रक्रिया सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात प्लास्टीकचा होत असलेला वापर बंद करण्याबाबत**

**(१५) * ३२०४ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या प्लास्टिक कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०११ मधील तरतूदींची राज्यात प्रभावी अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी स्थापन केलेली समिती गंभीर नसल्याबाबत दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात प्लास्टिक पिशव्यांच्या सर्रास व अनियंत्रित होणाऱ्या वापरावर निर्बंध आणण्यासाठी लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी केलेल्या सुचनांबाबत कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय व तदनुषंगाने राज्यात सुरू असलेला प्लास्टीकचा वापर त्वरीत व कायमस्वरूपी बंद करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

राज्यस्तरीय सल्लागार समितीतील तज्ञ व्यक्तींची नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे.

(२) आणि (३) महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्या (कॅरी बॅग्ज) (उत्पादन व वापर) नियम, २००६ नुसार, ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या तसेच ८X१२ पेक्षा कमी आकार असलेल्या प्लॅस्टिक पिशंव्यांवर बंदी घालण्यात आली आहे.

केंद्र शासनाच्या प्लास्टिक कचरा व्यवस्थापन व हाताळणी सुधारीत नियम २०११ नुसार प्लास्टिक कॅरी बॅग उत्पादकाची नोंदणी, उत्पादन व पुनर्वापर याबाबतची अंमलबजावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची असून प्लास्टिक कॅरी बॅगचा वापर, साठा, व वर्गीकरण तसेच विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही स्थानिक प्राधिकरणांची आहे. त्यानुसार उक्त नियमातील तरतुदींची कडक अंमलबजावणी करण्याकरीता नगरपालिका/नगरपरिषदा तसेच महापालिका प्रशासनास मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे स्तरावर कळविण्यांत आले आहे.

प्रतिबंधित प्लास्टिक पिशव्या विरोधी कठोर कारवाई करण्याकरीता मंत्री (पर्यावरण) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या बैठकीमध्ये सर्व संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करणेबाबत जनजागृती करण्याकरिता स्वयंसेवी संस्थेमार्फत राज्यभर २०० पेक्षा अधिक पथनाटये सादर करण्यांत आली आहेत. राज्यबाहेरुन येणाऱ्या ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांचा पुरवठा रोखण्याकरीता शहरातील प्रवेशावर निर्बंध घालून संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबत परिवहन विभाग, पोलीस प्रशासन व महानगरपालिका यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सूचीत केले आहे संपूर्ण राज्यात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकुण ५० उद्योगांवर कारवाई करुन त्या उद्योगांना बंदचे आदेश देऊन त्यापैकी ४१ उद्योगांकडून एकूण रुपये २,३०,०००/- इतका दंड वसूल केला आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत क्षेत्रिय स्तरावर प्लॉस्टिक कारखान्यांची स्वतंत्र तपासणी करण्याकरीता जानेवारी/फेब्रुवारी २०१५ मध्ये स्थापन केलेल्या स्वतंत्र तपासणी पथकांमार्फत सर्वेक्षण सुरु केले आहे. सद्यस्थितीत ७० ठिकाणी सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणाअंती दोषी आढळलेल्या ४ कारखान्यांवर पर्यावरण संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल करण्यांत आले आहेत. सध्या बंद असलेल्या ७ कारखान्यांना पुन्हा उत्पादन सुरु न करण्याचे आदेश देण्यात आले असून ९ कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. उर्वरित सर्वेक्षणांचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अन्न व औषध प्रशासन विभागातील भरतीमध्ये झालेली अनियमितता व घोटाळा**

**(१६) * ३४६२ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासन विभागातील सन २०१२ ते २०१४ मध्ये झालेल्या भरतीमध्ये अनियमितता व घोटाळा झाल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

सन २०१३-१४ मध्ये सह आयुक्त (अन्न) व सहायक आयुक्त (अन्न) या संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. तसेच सहायक आयुक्त (अन्न) व अन्न सुरक्षा अधिकारी संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आली आहेत. ही कार्यवाही सदर पदांच्या दि.१३.०९.२०१३ रोजी प्रसिद्ध झालेल्या सेवाप्रवेश नियमानुसार करण्यात आलेली आहे. यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठच्या आकृतीबंध आराखडयाबाबत**

**(१७) * २६८५ श्री.अनिल सोले, श्री.नागो गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा आकृतीबंध आराखडा तयार करण्यात आला असून तो अपूर्ण असल्यामुळे विद्यापीठाने सुधारित आराखडा शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा आकृतीबंध आराखडा अपूर्ण असल्याने अनेक विभागांतील कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रिक्त पदे वाढविण्याकरीता योग्यता व विद्यार्थी संख्या लक्षात न घेता काही पदे अवास्तव वाढविण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुधारीत आराखडा त्वरीत मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सुधारित आराखडा किती दिवसात मंजूर होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अकृषि विद्यापीठातील शिक्षकेतर पदांचा एकत्रित आढावा घेण्यात आला असून यासंदर्भात दि. ६ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यानंतर सर्व अकृषि विद्यापीठांचा विद्यापीठनिहाय व पदनिहाय आढावा निश्चित करण्यात आला असून त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठाचा पदनिहाय आकृतीबंध २३ डिसेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेला आहे.

-----------------

## मुंबई येथील हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळातील रोजंदारीवर असणा-या कामगारांबाबत

**(१८) * ३७९८ श्री.विजय गिरकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.किरण पावसकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ (मुंबई) येथील हाफकीन जीव औषध निर्माण महामंडळात सन १९९५ साली रोजंदारीवर कामावर घेतलेल्या कामगारांना पुन्हा नवीन विभाग सुरू झाल्यानंतर कामावर घेण्यात येण्याचे आश्वासन देण्यात येवूनही या कामगारांना सन २००७ साली कामावरून कमी करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडळाची सन २०१२ मध्ये मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्यासाठी ७५ जणांची भरती करण्यात आली असून मात्र ४२ रोजंदारी कामगारांना या भरतीमध्ये डावलण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच २०११ साली कामगारांना सेवाजेष्ठतेनुसार कामावर घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले असता १३४ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त ४२ रोजंदारी कामगारांना सामावून घेण्याबाबत न्यायालयाचे आदेश असतांनाही अद्यापी कामावर घेण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व तदनुषंगाने सदरहू कामगारांना त्वरीत कामावर घेण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) नाही.

(२) नाही.

(३) सन १९९५ ते २००२ पर्यंत दिनांक ३१/१२/१९९४ पर्यंतच्या १३३ रोजंदारी कर्मचाऱ्यांना त्रिपक्षीय करारानुसार टप्याटप्याने सामावून घेण्यात आले आहे.

(४) याबाबत मा.न्यायालयाने कोणतेही आदेश नाहीत. तथापि प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंहगड किल्याच्या दुरूस्ती कामामध्ये झालेला अपहार

**(१९) * ३४०८ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील सिंहगड किल्ल्याच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी पुरातन खात्याने दिड कोटी रुपयांचा निधी देऊनही ठेकेदाराने मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) सिंहगड किल्ल्याच्या जतन व दुरुस्ती कामाबाबत जिल्हा नियोजन समिती पुणे यांचे बैठकीत तत्कालीन मा.ना.पालक मंत्री यांनी जिल्हाधिकारी, पुणे यांना या कामाची चौकशी करण्याबाबत आदेश दिले होते. त्यास अनुसरुन जिल्हाधिकारी, पुणे यांनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे यांना सदर कामाची तांत्रिक तपासणी करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार प्राप्त अहवालात सकृतदर्शनी कामाचे परिमाण व दर्जाबाबत त्रुटी आढळून आल्यामुळे संबंधीत वास्तुविशारद, कंत्राटदार व विभागाचे कनिष्ठ अभियंता तथा शिबीर प्रमुख यांच्याकडून नोटीस व ज्ञापनाव्दारे खुलासा मागविण्यात आला आहे. तो प्राप्त होताच विहीत ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील प्रदुषणामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(२०) * ३८८२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील काही कंपन्यातून रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेवून हवेत विषारी गॅस सोडण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विषारी वायूमुळे दुर्गंधीयुक्त वातावरण निर्माण झाल्याने पहाटेच्या वेळी कामावर जाणाऱ्या काही कामगारांच्या व स्थानिक नागरीकांच्या प्रकृतीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने रात्रीच्या वेळी गैरमार्गाने विषारी वायू सोडण्यात येणाऱ्या संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, अलिबाग यांच्या अहवालानुसार हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील प्रकुलगुरु पद भरण्याबाबत**

**(२१) * ३९२६ श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील प्रकुलगुरु हे पद भरण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विचाराधीन बाबींवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) (३) व (४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठास प्रकुलगुरु हे पद निर्माण करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**अकोला तालुक्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या दुकानात झालेला गैरव्यवहार**

**(२२) * २९२९ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला तालुक्यातील मौजे दहिहांडा येथील दुकान क्र १०९ च्या सरकारी डी-१ मध्ये ५१ नांवे वाढविण्यात आली असून दरमहा धान्य देखील उचल होत असल्याबाबत तहसिलदार, अकोला, एस.डी.ओ.अकोला, डीएसओ, अकोला, आयुक्त अमरावती यांचेकडे जिल्हापरिषद सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत, दहिहांडा, यांनी १ वर्षापूर्वी तक्रारी करूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन रेशनकार्ड चे नांव बीपीएल मध्ये वाढवता येत नाही असे असतानाही शासनाच्या नियमाची पायमल्ली करून सदर नावे वाढविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीश बापट :** (१) ग्रामस्थ मंडळी दहिहांडा जि.अकोला या नावाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ चा तक्रार अर्ज जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांच्याकडे प्राप्त झाला असून त्याबाबत चौकशी करण्यात आलेली आहे.
(२) चौकशीमध्ये तहसील कार्यालयातील डी-१ रहिजस्टरमध्ये बी.पी.एल. ३४ व अंत्योदय १७ अशी अतिरिक्त नावे आढळून आली आहे.
(३) व (४) चौकशी अंती जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांनी त्यांच्या दिनांक ९ मार्च, २०१५ च्या आदेशान्वये वाढीव ३४ बी.पी.एल. कार्डे व १७ अंतोदय कार्डे रद्द केलेली असून, संबंधित रास्तभाव दुकानाचा परवाना निलंबित केला आहे.

शिधापत्रिकाधारकांची गैरसोयी होऊ नये म्हणून निलंबित करण्यात आलेल्या रास्तभाव दुकानास जोडलेल्या शिधापत्रिका अन्य दुकानास जोडण्यात आलेल्या आहे.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील नानंद (ई) येथील शाळेत अपुरा पूरक आहार देणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(२३) * ३४५३ श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुसद (जि.यवतमाळ) तालुक्यातील नानंद (ई) येथील शाळेत दिडशे ते पावणे दोनशे विद्यार्थ्यांना खिचडीच्या पूरक आहारासाठी सहा टमाटे आणि पाच रुपयांचा सांबार मसाला वापरला जात असल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अपुरा पूरक आहार देणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा स्वरुपाची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झालेली होती.
(२) व (३) सदर बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता शाळेमध्ये शालेय पोषण आहार शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार देण्यात येत असल्याचे तसेच आठवडयातून एक दिवस पूरक आहार देण्यात येत असल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी आणण्याबाबत**

**(२४) * ३५०२ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण प्रौढ व तरुणांमध्ये वाढत असल्याचे व त्याचे दुष्परिणाम मोठया प्रमाणात दिसून येत असल्याचे वास्तव ग्लोबल ॲडल्ट टोबॅको इंडिया या संस्थेच्या सर्व्हेमध्ये माहे डिसेंबर, २०१४ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन तंबाखू व तंबाखू जन्य पदार्थांवर बंदी आणण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रतिबंधित पदार्थाचा निर्मिती, साठवण, वितरण किंवा विक्री यास दिनांक २० जुलै, २०१४ पासून शासन आदेशानूसार १ वर्षाच्या कालावधी साठी प्रतिबंध केलेला आहे.

(३) उक्त आदेशाची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात काटेकोरपणे केली जाते आजतागायत एकूण ७२८८७ अस्थापनांची तपासणी केली आहे. ३४१८ प्रकरणी

रु. ४७७७९१००१/- इतक्या किमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे व १८०८ दोषी व्यक्तीविरुध्द खटले दाखल करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

**राज्यात विधी विद्यापीठ स्थापन करण्याचा शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावाबाबत**

**(२५) * ३११६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.विजय सावंत :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विधी विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विधि विद्यापीठ स्थापन करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) मुंबई, औरंगाबाद आणि नागपूर येथे महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, पुढील कारवाई सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर यैथील शासकीय वैघकीय महाविद्‌यालय व रुग्णालयाच्या भूखंडावर झालेले अतिक्रमण**

**(२६) * ३८३२ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालय व रुग्णालय २१८ एकर भूखंडावर विस्तारले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भूखंडाच्या जमिनीवर मटण मार्केट, धोबीघाट, लॉटरीची दुकाने इत्यादींनी अतिक्रमण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्‌याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नागपूर शासकीय वैद्‌यकीय महाविद्‌यालयाचा भुखंड हा २११.६ एकरचा आहे.

(२) सदर भूखंड नुकताच संस्थेच्या नावे करण्यात आलेला आहे. सदर संस्थेच्या परिसरातील संरक्षण भिंतीच्या काही भाग मोडकळीस आल्यामुळे काही प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. सदर अतिक्रमण हटविणेबाबत महानगरपालिका / पोलीस यंत्रणेच्या सहाय्याने कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोदामे उपलब्ध नसल्यामुळे अवकाळी पावसाने ७०० क्वि. धान भिजून खराब झाल्याबाबत**

**(२७) * २९५० श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी विकास महामंडळ व जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्यावतीने आधारभूत धान खरेदी केंद्राच्या माध्यमातून खरेदी केलेल्या धानाची साठवणूक करण्यासाठी गोदामे उपलब्ध नसल्यामुळे अवकाळी पावसाने ७०० क्विं. धान भिजून खराब झाल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१५ ला निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व त्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत गोंदिया जिल्हयात दि. ४ जानेवारी, २०१५ पर्यंत मार्केटिंग फेडरेशनमार्फत ४६ खरेदी केंद्रावर सुमारे २,५०,४९६.५९ क्विंटल धान खरेदी झाली होती. तर आदिवासी विकास महामंडळामार्फत ४० खरेदी केंद्रावर २,२९,५३५.८२ क्विंटल धान खरेदी झाली होती.

मार्केटिंग फेडरेशनमार्फत खरेदी केलेले संपूर्ण धान गोदामामध्ये सुरक्षितपणे साठवणूक केलेले आहे. तर आदिवासी विकास महामंडळामार्फत खरेदी केलेल्या धानासाठी गोदाम साठवणूक क्षमता अपूरी असल्याने खरेदी केलेला धान हा ताडपत्र्यांनी सुरक्षित ठेवलेला आहे.

दोन्ही अभिकर्ता संस्थांमार्फत गोंदिया जिल्हयात खरेदी केलेला धान अवकाळी पावसाने खराब झाल्याची वस्तूस्थिती नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सुजल योजनेंतर्गत १३५ लीटर माणसी प्रती दिवस पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याबाबत**

**(२८) * २७११ श्री.मितेश भांगडिया, श्री.अनिल सोले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून सर्व नगर पालिकांमध्ये १३५ लीटर माणसी प्रती दिवस पाणी पुरवठा योजना अस्तित्वात असेल तिथे भुयारी गटारी योजना लागू करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुजल योजनेंतर्गत नगर पालिकांना ७० लीटर माणसी प्रती दिवस योजनाच मंजूर केल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या नगरपालिकांना सुजल योजनेंतर्गत ७० लीटर माणसी प्रती दिवसप्रमाणे योजना मंजूर आहे त्यांना भुयारी गटारी योजना लागू होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सुजल योजनेंतर्गत १३५ लीटर माणसी प्रती दिवस पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, मंजूर न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय. केंद्र शासनाच्या सेवा दर्जा प्रमाणकानुसार (Service Level Benchmarks) ज्या शहरात भुयारी गटार योजना अस्तित्वात आहे, किंवा भुयारी गटार योजना घेण्यात येणार आहे अशा ठिकाणी दरडोई दर माणसी १३५ लिटर पाणी पुरवठा करण्यासाठी योजना आखणेबाबत मार्गदर्शक सूचना आहेत.

(२) नाही.

(३) होय

(४) व (५) पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील (१) पाणीपुरवठा, (२) मलनि:सारण, (३) पावसाचे पाणी वाहून नेण्यासाठी गटारे आणि (४) घनकचरा व्यवस्थापन या चार क्षेत्रांसाठी विहीत करण्यात आलेल्या सेवादर्जा प्रमाणकानुसार पाणीपुरवठयाचे प्रमाण दरडोई दरदिनी १३५ लीटरपर्यंत वाढविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत स्थानिक नागरी स्वराज्य संस्थांना कळविण्यात आले आहे.

-----------------

**पंढरपूर (जि.सोलापूर) येथे १७ हजार केशरी शिधापत्रिका धारकांना धान्य न मिळाल्याबाबत तसेच केरोसिनचा कोटा गोठविल्याबाबत**

**(२९) * ३७२५ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) १ तालुक्यातील १७ हजार केसरी शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य दुकानातून माहे ऑक्टोबर, २०१४ पासून धान्य मिळाले नाही हे खरे आहे काय,

(२) तसेच प्रत्येक महिना मिळणाऱ्या एक लाख ५६ हजार लिटर केरोसिनच्या कोटयापैकी ६० हजार लिटरचा कोटा विभागाने गोठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार केरोसिनचा कोटा गोठविला जाऊ नये म्हणून तसेच केसरी शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्य न देणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही करुन कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) खरे नाही.

केंद्र शासनाने माहे जानेवारी, २०१५ पासून राज्यास मिळणा-या केरोसिनच्या नियतनात माहे डिसेंबर, २०१४ मध्ये देण्यात आलेल्या केरोसिन नियतनाच्या सुमारे १८ टक्के कपात केली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत राज्यास मागणीच्या २८ टक्के इतके केरोसिनचे नियतन केंद्र शासनाकडून प्राप्त होते.

सबब माहे जानेवारी २०१५ करीता पंढरपूर तालुक्यासाठी प्राप्त केरोसिन नियतनाच्या प्रमाणात ९६ के.एल.केरोसीन नियतन देण्यात आले होते.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खाजगी इंग्रजी शाळांच्या मनमानी फी वसुलीवर आळा घालण्यासाठी शासनाने तात्काळ शुल्क नियंत्रण कायदा करण्याबाबत**

**(३०) * २७५३ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागील १० वर्षात खाजगी संस्थांच्या शाळा, अल्पसंख्यांक संस्थांच्या शाळा, इंग्रजी माध्यमांच्या शाळा, विद्यार्थ्यांच्या पालकांकडून नर्सरीपासून व पुढील शिक्षणापर्यंत १५ हजार ते १ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक शुल्क आकारतात, हे खरे आहे काय,

(२) तसेच इंटरनॅशनल आय.सी.एस.ई. सी.बी.एस.ई., आय.बी.आदी बोर्डांच्या शाळा वर्षाकाठी ३६ हजार ते १६ लाख रुपये वार्षिक शुल्क पालकांकडून वसूल करतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांवर शासनाचे शुल्क वसुलीबाबतचे कोणतेही नियंत्रण नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी संस्थांच्या शाळांवर शुल्क वसुली कायदा बनवून व त्याद्वारे नियंत्रण आणून पालकांची होणारी आर्थिक फसवणूक होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) (४) व (५) शैक्षणिक शुल्काबाबतच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून आकारण्यात येणा-या शुल्काचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) २०११ विधीमंडळाने पारीत केला. मा.राष्ट्रपती महोदयांच्या अधिसंमतीनंतर सदर अधिनियम दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी अधिसूचनेद्वारा प्रसिध्द करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून लागू करण्यात आली आहे.

-----------------

**पुणे शहरात निर्माण झालेली पाणी टंचाई**

**(३१) * ३१७१ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराला व परिसरातील काही गावांना एप्रिल-मे महिना सुरू होण्यापूर्वी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली असून त्यांच्यावर पाणीकपातीचे मोठे संकट निर्माण झाले असल्याने त्यांच्यात तीव्र चिंतेचे वातावरण निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणेकरांवरील आलेले पाणी कपातीचे संकट सोडविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) नाही.

(२) पुणे महानगर पालिका क्षेत्रात समाविष्ट शहर व गावांना खडकवासला, पानशेत, वरसगांव व टेमघर या चार धरणातून पाणी पुरवठा केला जातो. या सर्व धरणातील दिनांक २.३.१०१५ अखेरचा शिल्लक पाणी साठा १५.५० टीएमसी असून दिनांक ३.७.२०१५ पर्यंत शहरास ६.५० टीएमसी पाणी लागणार आहे. पुणे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट शहर व गावांना पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून दिनांक ३१.७.२०१५ पर्यंतचे नियोजन करण्याबाबत पाटबंधारे विभागास सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाणी टंचाई टाळण्यासाठी पाण्याचा योग्य वापर करण्याबाबत**

**(३२) * ३१४२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात या वर्षी कमी पाऊस पडल्यामुळे यंदा देखील हजारो टँकरव्दारे गावागावात पाणी पोहचवले जात असून पाण्याची टंचाई टाळण्यासाठी व पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी शासन यंत्रणा कमी पडत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने पाणी नियोजनासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा थोडक्यात तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. राज्यात या वर्षी सरासरीच्या ८६.३५% इतके पर्जन्यमान झालेले असून राज्यातील ५६० गावे व ६१७ वाड्यात ७२८ टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) व (३) राज्यात सरासरीपेक्षा ८६.३५ टक्के पर्जन्यमान झालेले असले तरी पावसाचे प्रमाण सर्व विभागात सारखे राहत नसल्यामुळे भुजल व सर्वेक्षण विकास व्यवस्थापन अधिनियम २००९ मधील कलम २०, कलम २२ व कलम २५ नुसार कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व विभागीय आयुक्तांना व जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. तसेच ऑक्टोबर २०१४ ते जून २०१५ या कालावधीकरीता टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले असून त्यात राज्याच्या सर्व विभागातील २१८२७ गावे व १६४१५ वाड्यात एकूण ४१२२७ उपाययोजना घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर शहरामध्ये वाढलेले प्रदूषणाचे प्रमाण**

**(३३) * ३९७७ श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर (जि.चंद्रपूर) हे शहर आधीच प्रदूषित असल्याने गेल्या वर्षी २ जानेवारी २०१४ रोजी पर्यावरण मंत्रालयाने एक परिपत्रक काढून वीज निर्मिती केंद्रासाठी उच्च प्रतीचा कोळसा वापरणे बंधनकारक केले असतांना पर्यावरण मंत्रालयाने नियम मोडून महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (महाजनको) ने चंद्रपूर वीज केंद्रात न धुतलेला कच्चा कोळसा तसेच कोळसा खाणीबरोबर शहराजवळील थर्मल पॉवर स्टेशन (सीटीपीएस) यांच्यामुळे प्रदूषण वाढत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या विद्युत केंद्रातील २१० मेगावॅटचे दोन संच ३० वर्षाहून अधिक जुने असून जुनाट तंत्रज्ञानावर हे दोन्ही संच उक्त जिल्ह्यात कार्यरत असल्याने प्रदुषण वाढत आहे याबाबत मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने सीटीपीएसला फटकारले असल्याने महाराष्ट्र प्रदूषण महामंडळाने संबंधितांना नोटीस बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबंधित कंपनीवर काय कार्यवाही केली वा नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे आहे. चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, चंद्रपूर येथे बॉयलरमध्ये न धुतलेला कोळसा वापरण्यात येतो.

(२) व (३) हे खरे आहे. महाऔष्णिक विद्युत केंद्रातील कार्यान्वित असलेल्या एकूण ७ संचांपैकी, २१० मेगावॅट संच क्र.१ व २१० मेगावॅट संच क्र. २ हे अनुक्रमे सन १९८३ व सन १९८४ मध्ये कार्यान्वित करण्यात आले.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर येथे जनहित याचिका क्र.१२५/२०१३ दाखल करण्यात आलेली असून बाब न्यायप्रविष्ठ आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगास जनहित याचिका दाखल होण्यापूर्वीच दि.२०/१२/२०१३ च्या पत्रान्वये अंतरिम निर्देश दिलेले आहेत.

(४) सदर उद्योगाने संच क्र.१ ची हवा प्रदूषण नियंत्रण व्यवस्था आधुनिक करण्याकरीता ठोस प्रस्ताव महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास सादर न केल्याने मंडळाने सदर उद्योगास दि.०२/०८/२०१४ रोजी नुतनिकरण करून प्रदान केलेल्या संमती पत्रात संच क्र.१ सुरू ठेवण्यास मनाई केल्याने सदर संच ऑगस्ट २०१४ पासून बंद आहे. तसेच सदर उद्योगाची २७.५ लक्ष रुपये बँक हमी जप्त करण्यात आलेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्राकरीता हवेच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन व आराखडा बनविण्याकरीता भारतीय प्रौद्योगिकी संस्थान मुंबई व राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्था यांना कार्यादेश प्रदान केलेला आहे व सदर कार्य प्रगतीपथावर आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद यांचेकडील अहवालानुसार मागील पाच वर्षाच्या आकडेवारीवरुन सदर आजाराच्या प्रमाणात वाढ किंवा घट झाल्याचे दिसुन येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापिठात मराठी विभागासाठी प्राध्यापकांची निवडमधील झालेला भ्रष्टाचार

**(३४) * ३२३१ श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाने मागील दीड वर्षापूर्वी मराठी विभागांकरीता तीन तासात १०० प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे,

(२) असल्यास, या भरती प्रक्रियेत डावलण्यात येणाऱ्या नागपूरमधील डॉ.प्रमोद मुनाघाटे यांनी ९ महिने माहितीच्या अधिकाराव्दारे पाठपुरावा करून सदर भरतीमध्ये प्राध्यापकांची निवड ही नियमबाह्य झाली असल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(५) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) नाही. अध्यापकांची भरती ही निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे झालेली आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दैठणा (जिल्हा परभणी) येथील पाणीपुरवठा योजनेत झालेला भ्रष्टाचार**

**(३५) * २८०१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दैठणा (जिल्हा परभणी) येथील पाणी पुरवठा योजनेच्या कामात समिती तसेच अधिकाऱ्यांनी खोटे मुल्यांकन व कागदोपत्री सोपस्कार पार पाडीत केलेल्या गैरप्रकारांची चौकशी करुन त्यांच्यावर गुन्हे नोंदविने सोबत आरआरसी रक्कमेची वसूली करण्याची मागणी परभणी-हिंगोली येथील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, पाणी पुरवठा योजना यांच्याकडे सन २०१४-१५ दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विहीत मुदतीत काम न करता गैरप्रकार करणाऱ्या पाणी पुरवठा समिती व पाणी पुरवठा विभागातील अधिकारी यांच्या कारभाराची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, दोषी कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.
(२) प्रस्तुत योजनेची अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, गुणवत्ता परीक्षण पथक, मुंबई यांचे मार्फत तपासणी करण्यात येत आहे.
(३) तपासणी अहवालाच्या आधारे पुढील आवश्यक कारवाई करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात सीमावर्ती भागातून येणारा गुटखा रोखण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याबाबत**

**(३६) * ४१६८ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यातील ७२ हजार ८८७ दुकानांची तपासणी केली त्यापैकी ३ हजार ४१८ ठिकाणी गुटखा सापडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गुटखा बंदी असूनही माहे जुलै-२०१२ पासून ४७ कोटी ७७ लाख ९१ हजारांचा गुटखा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, गुजरातमधून मोठ्या प्रमाणात गुटखा येतो हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाने सीमावर्ती भागातून येणारा गुटखा रोखण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणीसाठी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) राज्यात प्रतिबंधित असलेल्या पानमसाला, सुगंधित सुपारी, तंबाखू व तत्सम अन्नपदार्थांपैकी सीमावर्ती भागात त्यावर प्रतिबंध नाही. त्यामुळे सीमावर्ती भागातून येणारा साठा रोखण्याकरीता विविध चेकनाके, रेल्वे, बसस्थानक इत्यादी ठिकाणी पाळत ठेवून कारवाई करण्यात येते. यासाठी पोलिसांचे सहकार्य घेण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील किना-यावरील अनधिकृत बांधकामाबाबत

**(३७) * ४३३७ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील किना-यावर सीआरझेड कायदयाचे उल्लंघन करुन काही वर्षात तब्बल २४६ अनधिकृत बांधकामे उभी राहिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित विकासकावर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, याप्रकरणी कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडील सीआरझेड अधिसूचना १९९१ लागू झाल्यानंतर अलिबाग तालुक्यात किना-यावर १४५ व मुरूड तालुक्यात १४१ अशी एकूण २८६ इतकी अनधिकृत बांधकामे सीआरझेड क्षेत्रात केल्याचे निदर्शनास आले, असे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा किनारी क्षेत्र व्यवस्थापन समिती, रायगड-अलिबाग यांनी त्यांचे अहवालात नमुद केले आहे.

(२) होय.

(३) अलिबाग तालुक्यातील १४५ अनधिकृत बांधकामापैकी १५ बांधकामांवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून संबंधित प्रकरणांमध्ये रुपये ४९,६२,३२६/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

मुरूड तालुक्यातील एकूण १४१ अनधिकृत बांधकामांपैकी २२ बांधकामांवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हे दाखल करण्यांत आले असून संबंधित प्रकरणांमध्ये रुपये ४१,४०,८५६/- इतकी दंडाची रक्कम वसुल करण्यांत आली आहे.

उर्वरित बांधकांमावर, सहाय्यक संचालक, नगररचना रायगड-अलिबाग यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ नूसार नियमोचित कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे असे जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी त्यांचे अहवालात नमुद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बिलोली (ता.जि.नांदेड) येथील पाणीटंचाई दूर करण्यासाठी करावयाची कारवाई

**(३८) * ४३९२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (ता.जि.नांदेड) येथील कुंडलवाडी व परिसरातील २४ गावांमध्ये पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले असून गोदावरी व मांजरा नदी कोरडी पडल्यामुळे या भागातील अनेक गांवामध्ये पाण्याची पातळी झपाट्याने कमी होऊन पाणीटंचाई भासत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कुंडलवाडी शहरात नगरपालिका पाणीपुरवठा करीत असून तीन दिवसाआड पाणी मिळत असल्याने नागरिकांची पाणीटंचाईमुळे गैरसोय होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पाणीटंचाई त्वरीत दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) बिलोली तालुक्यातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घ्यावयाच्या माहे ऑक्टोंबर २०१४ ते जून २०१५ या कालावधीचा ८२ गावे व २ वाडयांमध्ये २८१ उपाययोजनांचा समावेश असलेला रु. १२६.८६ लक्ष किंमतीचा टंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत बिलोली तालुक्यात ६ गावात ८ खाजगी विंधन विहिरी अधिग्रहीत करुन, ५ गावात ५ नवीन विहीरींची कामे पूर्ण करुन व ९४ विंधन विहिरींची विशेष दुरुस्तीची कामे पूर्ण करुन पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच, कुंडलवाडी शहरातील रु. १३.७७ लक्ष किंमतीची तातडीची पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून सदर योजनेचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरात बोगस व बेकायदेशीर सुरू असलेल्या पॅथॉलाजी लॅब कडे महापालिकेचे होत असलेले दुर्लक्ष**

**(३९) * ४४१७ श्री.हरिसिंग राठोड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात बोगस व बेकायदा पॅथॉलाजी लॅब सुरू करून रुग्णांची फसवणूक केली जात असतानाही महापालिकेचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस व बेकायदेशीर पॅथॉलाजी लॅब चालविणा-यावर व याबाबीकडे दुर्लक्ष करणा-या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यातील शेगाव-पाथर्डी पाणीपुरवठा योजनेच्या कामातील गैरकारभाराबाबत**

**(४०) * ४५६८ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या पंधरवड्यात झालेल्या सर्वसाधारण सभेत शेगाव-पाथर्डी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामास मंजूरी न घेताच कोट्यावधी रुपये खर्च करून योजना अनधिकृत चालवल्या जात असल्याप्रकरणी तसेच पुरवठा झालेल्या मालाची गुणवत्ता न तपासताच बिले अदा करण्यात समाजकल्याण अधिकारी व संबंधित कार्यकारी अधिकारी तसेच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांची चौकशी करून त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे व झालेल्या खर्चाची वसूलीही करण्यात यावी, अशा आशयाचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

माहे जानेवारी २०१५ रोजीच्या जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत योजनेच्या देखभाल दुरुस्तीच्या कामाची रु.८२११७५०/- किंमतीची निविदा प्रक्रीया करण्यास मान्यता होण्यासाठी विषय ठेवण्यात आला होता. सभागृहात सविस्तर चर्चा होवून सदर योजना चालविण्यासाठी सयुक्त समितीचे गठण करावे, तोपर्यंत सभेमध्ये ठेवण्यात आलेला विषय स्थगित ठेवण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

शेवगांव पाथर्डी नळ पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदे मार्फत चालविण्यात येते. योजनेवर झालेला खर्च जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या निर्णयाच्या अधिन राहून खर्च करण्यात आलेला असून झालेला खर्च हा नियमानुसार करण्यात येत आहे.

समाजकल्याण विभागाने जिल्हा परिषद सेसफंडातून खरेदी केलेल्या साहित्याची तालुका स्तरावर गुणवत्ता न तपासता देयक अदा केल्याबाबत चर्चा झाली. सदर खरेदीबाबत सविस्तर चौकशी करण्याचा निर्णय सभेमध्ये घेण्यात आला.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**तोरणा गड (पुणे) येथील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्याबाबत**

**(४१) * ४६३१ डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगातील पहिल्या स्वातंत्र्य लढयाची राष्ट्रीय स्मारके म्हणून जगात अजरामर असलेले छत्रपती शिवरायांचे गडकोट तोडून गडाचा तथाकथित विकास करुन कोटयावधी रुपयांचा नफा मिळविला जात असल्याचा प्रकार पुणे जिल्हयाच्या पश्चिमेला असलेल्या तोरणा गडावर सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, या अनधिकृत बांधकामाकडे वरिष्ठ अधिकारी, बांधकामतज्ञ तसेच पुरातत्व खात्याचे अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

तोरणा किल्ला या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन व दुरुस्ती काम सुरु असून यात किल्ल्यावरील तोरणेश्वर मंदिर, कोकण दरवाजा व अंबरखाना यांचा समावेश आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना गट विमा न मिळाल्याबाबत**

**(४२) * ४६४८ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षकांची गट विम्याची प्रकरणे जिल्हा परिषद ठाणे येथे सन २००६ पासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, सदर सेवानिवृत्त शिक्षकांना गट विमा न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) व (३) गटस्तरावर गटविमा प्रकरणे तपासणी सूचीतील कागदपत्रांची पूर्तता संबंधीत सेवानवृत्ती धारकांकडून न झाल्याने प्रस्ताव प्रलंबित राहिले होते. सदर प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करुन प्रकरणे निकाली काढण्यात येतील.

-----------------

**सिंधुदूर्ग जिल्हयात एक गाव, एक शाळा पॅटर्न राबविणेबाबत**

**(४३) * ४६८४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्हयात एक गाव, एक शाळा पॅटर्न राबविण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आजाराशी झुंजणाऱ्या जेष्ठ कलावंताना मदत मिळावी याकरिता आरोग्य योजना सुरु करण्याचा प्रस्तावाबाबत**

**(४४) * ४९१३ श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आजाराशी झुंजणाऱ्या जेष्ठ कलावंताना मदत मिळावी याकरिता आरोग्य योजना सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विचाराधीन प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर जेष्ठ कलावंताना भरीव अर्थसहाय्य व्हावे म्हणून कोणती उपाययोजना केली आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्री सारंगस्वामी शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी या संस्थेच्या परभणी व वसमत येथील शाळांमध्ये बोगसरित्या शिक्षक भरती केल्याबाबत**

**(४५) * ५२०८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री सारंगस्वामी शिक्षण प्रसारक मंडळ, परभणी या संस्थेच्या परभणी व वसमत येथील शाळांमध्ये बोगसरित्या शिक्षक भरती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बोगस शिक्षक भरतीबाबत चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार बोगस शिक्षक भरती केल्याप्रकरणी संस्थेवर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) होय.
(३), (४) व (५) चौकशी सुरू असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कारवाई करण्यात येईल.

-----------------

**पुणे येथील टिळक मंदीर येथे नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी वकीलांनी अश्लिल शेरेबाजी केल्याबाबत**

**(४६) * ५३६० श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टिळक मंदीर (पुणे) येथे शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी आयोजित केलेले मिस्टर आणि मिसेस नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी हजर असलेल्या काही वकीलांनी मोठ्या आवाजात अश्लिल शेरेबाजी करून नाट्य प्रयोगात व्यत्यय आणला, हे खरे आहे काय,
(२) या प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) चौकशीत काय आढळून आले व तद्‌ननुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अशा प्रकारची घटना घडल्याबाबत पुणे शहर आयुक्तालय अथवा संबंधित पोलीस ठाणे अथवा चौकीत अर्ज किंवा अन्य काही तक्रार किंवा गुन्हा दाखल झालेला नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरीवली (मुंबई) येथील जेबीसीएन शाळेने जादा शुल्काची केलेली आकारणी**

**(४७) * ५५३५ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली येथील जेबीसीएन शाळेमध्ये प्रवेशाच्या वेळी पालकांना शाळेत पायाभूत सुविधा व उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी ५० ते ६० हजार रुपयांच्या दरम्यान शुल्क आकारले जात असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पालकांची होत असलेली फसवणूक पाहता शाळा व्यवस्थापनाबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कारवाईस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) होय. प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) २०११ अधिनियम दिनांक २१ मार्च, २०१४ रोजी अधिसूचनेद्वारा प्रसिध्द करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात दिनांक १ डिसेंबर, २०१४ पासून लागू करण्यात आला असल्याने सदर अधिनियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सदर शाळेस देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**राज्याबाहेर उत्पादित केलेल्या भेसळयुक्त औषधांचे वितरण थांबविण्याबाबत**

**(४८) * ५७५७ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राबाहेर औषध उत्पादन घेवून महाराष्ट्रात वितरित होणाऱ्या डायक्लोफिनॅकसोडीअर, तसेच सीबी फलेक्स या औषधांमध्ये कागद व प्लास्टीकची भेसळ असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुषंगाने राज्यात भेसळ औषधांचे वितरण थांबविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.

१) दिनांक ११/१२/२०१४ रोजी उमरी, जिल्हा नांदेड येथील मे.आयुष मेडीकल अँड जनरल स्टोअर्स या पेढीची नियमित तपासणी करताना डायक्लोफिनॅकसोडीयम घटकयुक्त Dolokind AQ Injection, B.No AOFEN००६, Mfg by, M/s Troikaa Pharmaceuticals Ltd, Survey No. ४६/१- ४, Kadia Village, Nani Daman-३९६२१० या औषधाच्या एका ॲम्प्युलमध्ये तरंगणारे कण (कागद किंवा प्लॅस्टिकचे तुकडे) असल्याचे आढळले होते.

२) सीबी प्लेक्स, व्हिटॅमिन बी-कॉम्प्लेक्स इंजेक्शन, बॅच नं. FH-१५८, D/Mfg. ०४/२०१४, D/Exp.०९/२०१५, M.Lic. No. ६०४-B (H), Mfd by : Coax Bio remedies Pvt ltd. Hisar-१२५ ०४४ ही औषधी अमरावती महानगरपालिका, अमरावती यांचे तक्रारीवरुन विश्लेषणासाठी घेण्यात आली होती. सदर औषध शासकीय औषध नियंत्रण प्रयोगशाळेने अप्रमाणित घोषित केले, तथापि औषधीमध्ये कागद किंवा प्लॅस्टिकचे तुकडे असल्याचे विश्लेषण अहवालात नमूद नाही.

(२) होय.

(३) औषध नियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई यांनी सदर औषध अप्रमाणित घोषित केल्यावर उत्पादकास अप्रमाणित औषध साठा परत मागविणेबाबत सूचना दिल्या तसेच त्यानुसार महाराष्ट्रातील सर्व औषध विक्रेते/वितरकांना कळविण्यात आले. उत्पादक पर राज्यातील असल्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करण्यासाठी संबंधित राज्याच्या औषध नियंत्रकांस कळविण्यात आले तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या नांदेड कार्यालयाकडून उत्पादकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे व पुढील कारवाई सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिर्गोणी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील महाजल स्वराज्य प्रकल्पाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(४९) * ५८९३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्गोणी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील महाजल स्वराज्य प्रकल्पाचे (पाणी पुरवठा विभागाचे) काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करुन त्यात तेथील अधिकारी व ठेकेदारांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन दोषी अधिकारी व ठेकेदारांवर तातडीने कारवाई करावी अशी मागणी तेथील ग्रामपंचायत सदस्य व नागरिकांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर, जिल्हा पाणी पुरवठा विभाग सोलापूर, गट विकास अधिकारी पंचायत समिती माळशिरस यांचेकडे सन २०१२-२०१३ पासून आजपर्यंत केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, व तदनुषंगाने दोषी असणाऱ्या अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप शासनाने चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. शिर्गोणी, ता.माळशिरस, जि.सोलापूर येथील नळ पाणी पुरवठा योजना महाजल स्वराज्य प्रकल्पांतर्गत नसून महाजल योजनेंतर्गत आहे.
(2) होय, हे खरे आहे. दि. २० फेब्रुवारी, २०१० रोजी तक्रार करण्यात आली होती.
(3) व (४) होय, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग माळशिरस, जि.सोलापूर यांनी सदर योजनेच्या केलेल्या चौकशीनुसार पाझर विहीरीस मुबलक पाणी लागल्याने खोदकाम १० मी. पुर्ण, बैठ्या साठवण टाकीचे काम जोत्यापर्यंत पुर्ण, वितरण व्यवस्थेचे काम ८० टक्के पुर्ण व पाईपलाईन कोठेही उघड्यावर नाही. योजनेच्या कामाचे साहित्य चाचणी करुन पुरवठा करण्यात आला आहे. सद्यस्थितीत योजनेची कामे पुर्ण झाली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अशासकीय अनुदानित चित्रकला महाविद्यालये व औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयांना वेतन देण्याबाबत

**(५०) * ३७४६ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.कपिल पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासनमान्य अशासकीय अनुदानित ३१ चित्रकला महाविद्यालयांना व औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयांना वेतन अनुदान ९० टक्के दिले जात असल्याने ते १०० टक्के दरमहा नियमित मिळण्यासाठी आणि प्रलंबित मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य चित्रकला महाविद्यालयीन शिक्षक शिक्षकेतर संघाचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.वित्त व नियोजन मंत्री व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागण्यांचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू ३१ चित्रकला महाविद्यालयांना व औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयांना १०० टक्के वेतन अनुदान तसेच समान काम समान वेतन देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) राज्यातील शासनमान्य अशासकीय ३१ अनुदानित चित्रकला महाविद्यालयांना व औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयांना वेतन अनुदान ९०% दिले जात असल्याने ते वेतन अनुदान १००% दरमहा नियमित मिळण्याबाबतची मागणी आहे.

(३) राज्याची सध्याची आर्थिक परिस्थिती पहाता, तूर्त मागणी मान्य करता येणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षकांची अर्धवेळ सेवा ग्राह्य धरून सेवानिवृत्ती वेतन देण्याबाबत**

**(५१) * ३२६१ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किमान १० वर्ष पूर्णवेळ कर्मचारी म्हणून सेवा केल्याशिवाय सेवानिवृत्ती वेतन देय नाही, हे खरे आहे काय,
(२) सेवानिवृत्ती होतांना पूर्ण वेळ सेवा १० वर्षाची होत नसल्यास संबंधित कर्मचाऱ्यांची मान्यताप्राप्त अर्धवेळ सेवा सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरण्याबाबतचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्र.२३५४/२०१२ मध्ये दि. ७ जानेवारी, २०१४ रोजी दिले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायालयीन आदेशानुसार अद्यापही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(४) याबाबत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी दि. २० मे,२०१४,१३ जानेवारी, २०१४, ७ जानेवारी, २०१३, ८ जानेवारी, २०१४, ५ जुन, २०१३, १३ सप्टेंबर, २०१३, ५ नोव्हेंबर, २०१३ च्या निवेदनांच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची व न्यायालयीन आदेशाचा अवमान करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) न्यायालयीन आदेशा अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**राज्यातील अनुदानीत माध्यमिक विद्यालयाच्या विनाअनुदानित तुकडयांना अनुदान देण्याबाबत**

**(५२) * २८८४ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदानीत माध्यमिक विद्यालयाच्या विनाअनुदानित तुकड्या अनुदान पात्र म्हणून घोषित केलेल्या असणे, मात्र गेल्या २ वर्षापासून तुकडयांना अनुदान देण्यासाठी निधीची तरतूद होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुदानित तुकड्यांची/शाळांची संख्या किती व सदर तुकड्यांना/शाळांना शासन अनुदान केव्हापर्यंत देणार आहे,
(३) असल्यास, उक्त निधीची तरतूद करण्यासाठी तसेच विलंबास दोषी असणाऱ्या संबंधितांवर कार्यवाही करुन शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) शासनाने सन २०१४-१५ मध्ये १९६७ वर्ग तुकड्या व ८५८ विनाअनुदानित माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित केलेले आहे. सदर वर्ग/तुकड्यांना शासन निधीच्या उपलब्धतेनुसार वेतन अनुदानासाठी तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाडयातील पाण्याची गंभीर समस्या सोडविण्याबाबत**

**(५३) * ४१४७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात गेल्या तीन वर्षात अत्यल्प पाऊस झाल्याने मराठवाडयातील धरणातील पाण्याने तळ गाठल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे संकट व्यापक झाले असून प्रमुख शहरात सध्या सात ते दहा दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे व प्रकल्पातील पाणी साठा संपत आल्याने टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याचे स्त्रोतही उपलब्ध नसल्याने पाण्यासाठी नागरिकांना स्थलांतर करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रमुख शहरांना नळाद्वारे पाणीपुरवठा होत असता तरी अनेक ठिकाणचे प्रकल्प पाण्याअभावी कोरडे पडल्याने तेथील पाणीपुरवठाही खंडीत होत असल्याने लोकांना पाण्यासाठी दुरदुरवर जावे लागते तसेच लातूर जिल्ह्यात १८ लघुप्रकल्प पाण्याअभावी कोरडे पडले असून तेथे पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली आहे तसेच मराठवाडयात मार्च, २०१५ पर्यंत पूरेल इतकाच पाणीसाठा काही प्रकल्पांमध्ये शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठवाडयातील पाण्याची गंभीर समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणकोणत्या उपायोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. विभागातील नागरिकांनी पाण्यासाठी जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात स्थलांतर केल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही. विभागातील जे प्रकल्प कोरडे पडले आहेत. अशा ठिकाणी तातडीची उपाययोजना म्हणून टँकर व विहिर अधिग्रहणाद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. तसेच औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद या मराठवाड्यातील प्रमुख शहरांना पाणी पुरवठा करणा-या योजनांसाठी आवश्यक पाणी साठा असल्याने जून, २०१५ पर्यंत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही.

(३) पाणी टंचाई जाणवत असलेल्या ठिकाणी भूजल अधिनियम अंतर्गत टंचाई घोषित करण्यात आली असून पाणी टंचाई निवारणार्थ माहे ऑक्टोबर, २०१४ ते जून २०१५ या कालावधीसाठी सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांनी पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ कृती आराखडा तयार करुन त्यास मंजूरी दिलेली आहे. सदर कृती आराखड्यात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक ३.२.१९९९ च्या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या विहित ९ उपाययोजनांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्याध्यापकांना कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याबाबत

**(५४) * ३३८४ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिसांच्या धर्तीवर राज्यातील प्राथमिक/माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुख्याध्यापक यांच्यासाठी सावित्री-फातिमा कॅशलेस आरोग्य योजना लागू करण्याची मागणी शिक्षक भारती या मान्यताप्राप्त संघटनेने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## बीड येथील विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतीगृहातील अनियमिततेबाबत

**(५५) * ३६६० श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शासकीय वसतीगृहाची दिनांक १४ जानेवारी, २०१५ वा त्यासुमारास दारुड्यांनी तोडफोड करुन हल्ला केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारानंतर अधिका-यांनी दिलेल्या भेटीत वसतीगृहातील अनियमिततेबाबत अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस आले आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, वस्तीगृहातील उघडकीस आलेल्या गंभीर प्रकरणाबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा देण्यासाठी झालेल्या विलंबास दोषी असणा-याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे. सदर वसतिगृहातील काही उपद्रवी विद्यार्थ्यांनी समाज कंटकांच्या मदतीने हा हल्ला करुन तोडफोड केली आहे. याप्रकरणी वसतिगृहातील कर्मचा-यांनी शिवाजीनगर, बीड पोलीस स्टेशन येथे दिनांक १६.१.२०१५ रोजी गुन्हा दाखल केलेला आहे.

(२) हे खरे नाही. सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांनी दिनांक २५.१.२०१५ रोजी वसतीगृहास भेट दिल्यानंतर तेथील विद्यार्थ्यांशी चर्चा केली असता सदर वसतिगृहामध्ये कोणतीही अनियमितता झाली नसल्याचे निदर्शनास आले.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे येथील बालचित्रवाणी संस्थेचे पुनरुज्जीवन करणेबाबत**

**(५६) * ३५३८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टेट इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन टेक्नॉलॉजी म्हणजेच पुणे येथील बालचित्रवाणी ही लहान बालकांना प्रबोधित करणारी संस्था १९८४ साली केंद्र शासनाच्या इन्सॅट फॉर एज्युकेशन या योजनेअंतर्गत देशातील अन्य राज्यांसह महाराष्ट्र राज्यात स्थापन करण्यात आली असून या संस्थेसाठी १२० कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच या बालचित्रवाणी संस्थेच्या स्थापनेवेळी केंद्र शासन व राज्य शासनामध्ये झालेल्या करारानुसार सदर संस्थेची जबाबदारी ही राज्य शासनाची राहणार असल्याचे ठरविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेसंदर्भातील बैठकींना राज्य शासनाचे संबंधित अधिकारी अनुपस्थित राहिल्यामुळे केंद्र शासनाने या संस्थेसाठी निधी बंद केला असल्याने गेली ९ महिने या संस्थेतील कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात आले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षणातील बालचित्रवाणी या प्रभावी दृकश्राव्य माध्यमाची गरज आणि गांभीर्य विचारात घेवून या संस्थेला पुनरुज्जीवित करण्याच्यादृष्टीने व संस्थेतील कर्मचाऱ्यांना नियमित वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे अथवा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे. शासनाने दिनांक २९ जानेवारी,१९८४ च्या शासन निर्णयाव्दारे बालचित्रवाणी संस्थेची स्थापना करुन त्यामध्ये १२० कर्मचाऱ्यांच्या पदांना तात्पुरती स्वरुपात मंजूरी दिली होती. व प्रारंभिक ०५ वर्षे संस्थेची सर्व जबाबदारी केंद्र शासनाची असेल असे सूचित केले होते.

(३) संस्थेस केंद्र शासनाकडून १९८४ ते २००२ पर्यंत कार्यक्रम निर्मिती अनुषंगिक खर्च व कर्मचारी वेतनासाठी संपूर्ण अनुदान मिळत होते. २००३ पासून २०१२ पर्यंत केंद्र शासनाकडून प्रकल्प तत्वावर कार्यक्रम निर्मिती व अनुषंगिक खर्चासाठी अनुदान प्राप्त होत होते. तथापि, सन २०१३-२०१४ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान मार्फत बालचित्रवाणीने प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार सादर केलेल्या प्रस्तावामध्ये केंद्र शासनाने काही त्रुटी दर्शवून प्रस्ताव अमान्य केल्याने एप्रिल,२०१४ पासून सदर संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन थकित आहे.

(४) बालचित्रवाणी संस्थेतील कर्मचाऱ्यांना थकित वेतन देण्याबाबत प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

-----------------

**पुणे विभागातील ७५० तर राज्यातील ५००० वजन-मापे, यांच्या परवाना नुतनीकरणाची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(५७) * ५६६५ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे विभागातील ७५० तर राज्यातील ५००० वजन-मापे, उत्पादक, दुरुस्तक आणि विक्रेते यांच्या परवाना नुतनीकरणाची कामे वैधमापन विभागाकडे प्रलंबित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) सन २०१५ या वर्षासाठी राज्यातील वजन-मापे उत्पादक, दुरुस्तक व विक्रेत्यांच्या परवान्यांचे नुतनीकरण करण्यासाठी एकूण १४८३ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २४३ परवाने नुतनीकरणासाठी प्रलंबित आहेत.

पुणे विभागामध्ये सन २०१५ या वर्षासाठी दुरुस्तक आणि विक्रेत्यांचे वजन-मापे परवाना नुतनीकरणासाठी एकूण ३१५ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २३ परवान्यांचे नुतनीकरण करण्याचे प्रलंबित आहे.

(२) अर्जदारांनी, आवश्यक असलेल्या कायदेशीर तरतुदींची पूर्तता न केल्यामुळे परवाना नुतनीकरणाची प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधितांना लेखी निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खामगांव (जि.बुलडाणा) मतदार संघातील खारपाण पट्टयातील गांवे (जळगांव जामोद व शहर) १४० गाव योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत**

**(५८) * ४०५६ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव, (जि.बुलडाणा) मतदार संघातील खारपाण पट्टयातील गांवे (जळगांव जामोद व शहर) १४० गाव योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबतची मागणी खामगांव मतदार संघाचे आमदार ॲड श्री.आकाश पांडुरंग फुंडकर यांनी दिनांक २४ डिसेंबर २०१४ रोजी मा.मंत्री पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे पत्राद्वारे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खारपाण पट्टयातील गांवे वरील योजनेमध्ये समाविष्ट करणेबाबत शासन काय कारवाई करणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) १४० गांवे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेस दिनांक ०२.१२.२०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. योजनेच्या कामाला सुरुवात झाली आहे.

प्रस्तुत योजनेत विधानसभा सदस्यांच्या मागणीनुसार गावे समाविष्ट करण्याबाबत तांत्रिक तपासणी करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारप्राप्त खेळाडुंना शासकीय नोकरीत सामावून घेणेबाबत**

**(५९) * ३०४८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडुंना शासनाच्या ५ टक्के आरक्षणातून शासकीय नोकरीत सामावून घेतले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील रमेश श्यामराव वरळी तसेच लौकीक जगन्नाथ फुलकर या शिवछत्रपती पुरस्कार खेळाडुंना शासनातर्फे अद्यापही शासकीय नोकरीत सामावून घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडुंना शासकीय नोकरीपासून वंचित राहवे लागणार आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दिनांक ३०.०४.२००५ च्या शासन निर्णयान्वये अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत नोकरीसाठी ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. सदर शासन निर्णयामधील तरतूदीनुसार शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त करणारे खेळाडू नियुक्तीसाठी पात्र ठरत असल्यास त्यांचाही नियुक्तीसाठी विचार केला जातो. तथापि केवळ शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त केल्यामुळे खेळाडू ५ टक्के आरक्षणाअंतर्गत नोकरीसाठी पात्र ठरत नाहीत.

(२) व (३) श्री. रमेश श्यामराव वरळी व लौकीक जगन्नाथ फुलकर या शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूंनी ५ टक्के आरक्षणाअंतर्गत नोकरीसाठी अर्ज केल्यास व ते संबंधित पदासाठी विहित केलेले शैक्षणिक व क्रीडाविषयक अर्हता, वय इ.बाबत पुर्तता करत असल्यास ५ टक्के आरक्षणाअंतर्गत नोकरीसाठी त्यांच्या अर्जाचा विचार हेवू शकेल.

-----------------

**राज्यात मतदार नोंदणीसाठी शिक्षकांना पुनः नियुक्त करण्याच्या धोरणाबाबत**

**(६०) * २८२८ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी महिन्यापासून पुन्हा मतदार नोंदणी मोहिम सुरु होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोहिमेत मतदार नोंदणीसाठी आधार कार्ड बंधनकारक करण्यात आले असून मतदार नोंदणीचे काम पुनश्च शिक्षकांनाच देण्यांत येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे मार्च आणि माहे एप्रिल महिन्यात विद्यार्थ्यांची वार्षिक परिक्षा असते, अध्यपनासाठी शिक्षक वर्गावर नसले तर विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येईल, ही बाब शासनाचे निदर्शनास आले आहे काय,
(४) असल्यास, शिक्षण हक्क कायदा - २००९ नुसार शिक्षकांची शाळाबाह्य कामासाठी नेमणुक करता येत नाही, असे असूनही शिक्षकांकडून वारंवार शाळाबाह्य कामे सर्रासपणे करुन घेतली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता ढासळू नये, म्हणून तसेच वार्षिक परिक्षेच्या पार्श्वभुमीवर मतदार नोंदणीसाठी बीएलओ म्हणून शिक्षकांची नेमणूक होवून नये, अशी राज्यातील शिक्षकांकडून मागणी करण्यांत येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शाळाबाह्य कामांसाठी शिक्षकांची नेमणूक न करणेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) व (३) मतदार नोंदणीसाठी आधार कार्ड बंधनकारक करण्यात आलेले नाही. निरंतर मतदार नोंदणी माहिमेंतर्गत मतदार नोंदणीसाठी शिक्षकांसह अन्य शासकीय कर्मचाऱ्यांच्याही नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. तथापि, अध्यापनामध्ये अडथळा आल्याची कोणतीही बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) नाही.
(५) व (६) दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे व निवडणूकांच्या कर्तव्याखेरीज शिक्षकांना कोणतेही शिक्षकेतर काम न देण्याबाबत दि. १८.६.२०१० च्या परिपत्रकान्वये संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**राज्यातील जिल्हा व तालुका पातळीवरील न्यायालयाचे कामकाज मराठीतून करण्याबाबत**

**(६१) * ३४६८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठी भाषा विभागांतर्गत न्याय व्यवहाराच्या मराठीकरणासाठी काम करणारा उपविभाग स्थापन करण्याची मराठी अभ्यास केंद्र व लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी माहे नोव्हेंबर, २०१४ पर्यंत शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) दिनांक २१ जुलै, १९९८ च्या अधिसुचनेनुसार राज्यातील जिल्हा व तालुका पातळीवरील न्यायालयाचे शंभर टक्के कामकाज मराठीतून करण्याबाबतच्या निर्णयाची अद्यापही राज्यात अंमलबजावणी झालेली नसल्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(३) तसेच राजभाषा मराठीला मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा म्हणून मान्यता मिळावी अशी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच बॉम्बे हायकोर्टाचे मुंबई उच्च न्यायालय असे नामकरण करण्याची लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१३ मध्ये वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग (१), (२), (३) व (४) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

मराठी भाषा धोरणाच्या मसुदयामध्ये न्याय व्यवहारात मराठीचा वापर करण्याची बाब अंतर्भूत आहे. त्याअनुषंगाने भाषा धोरणास अंतिम स्वरुप प्राप्त झाल्यावर त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(२) होय.

(३) होय.

(४) होय.

(५) प्रश्न भाग १ वरील प्रमाणे.

प्रश्न भाग २ व ३ याबाबत कार्यवाही सुरु आहे.

प्रश्न भाग ४ बाबत बॉम्बे हायकोर्टाचे "मुंबई उच्च न्यायालय" असे नामकरण करण्याबाबत केंद्र शासनाकडून कायदेशीर बाबी तपासण्यात येत आहेत.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमध्ये आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत**

**(६२) * ५०८० श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमध्ये आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची व्यवस्थितरित्या अंमलबजावणी होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची व्यवस्थित अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत  नाही.

-----------------

### खेड (जि.रत्नागिरी) येथील बोरज धरणातील पाणी दुषित झाल्याबाबत

**(६३) * ३८८४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या बोरज धरणाला जे नाले येवून मिळतात त्यामध्ये विषारी रसायन सोडण्यात आल्याची घटना माहे जुलै, २०१४ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेनंतर धरणांतील पाण्याचे शुध्दीकरण करण्यात येईपर्यंत धरणातून खेड शहराला करण्यात येणारा पाणीपुरवठा बंद ठेवावा लागला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणातील पाण्यात विषारी रसायन सोडल्याने याबाबतचा शोध घेण्यासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळ व संबंधीत पोलीस विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) याबाबत संबंधीत खात्याने कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. रामदास कदम :** (१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार हे खरे आहे.

(२) मुख्याधिकारी, खेड नगरपरिषद यांच्या दि. ०४.०३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. ०९/०७/२०१४ रोजी खेड पोलिस ठाणे यांनी गु.र.न.१४/२०१४ भा.दं.वि.२७७, ३४ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यात अन्न व औषधी विभागात अपंगांच्या जागा रिक्त असल्याबाबत

**(६४) * ३९४५ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अन्न व औषधी विभागात अपंगांसाठी आरक्षित असलेल्या वर्ग अ, ब, क, ड, च्या १२६३ जागा रिक्त आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त जागा मा.उच्च न्यायालयाने आदेशानुसार भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय,

**श्री. गिरीश बापट :** (१) नाही. हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनात गट-अ,ब,क व ड ची मिळून एकूण ११७६ पदे मंजूर आहेत. गट-अ व ब मधील पदोन्नतीच्या पदांना अपंगांचे आरक्षण लागू नाही. गट-क व ड मधील पदोन्नतीच्या पदांना तसेच गट-अ ते ड मधील सरळसेवेच्या पदांना अपंगांसाठी ३% आरक्षण लागू आहे.

(२) व (३) अन्न व औषध प्रशासनातील अंपगांची पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे.

(४) लागू नाही.

-----------------

**यवतमाळ (जि.यवतमाळ) दगडी इमारत परिसरातील जिल्हा परिषदेच्या ऊर्दु शाळेचे दुरवस्था झाल्याबाबत**

**(६५) * ५०३७ श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ (जि.यवतमाळ) दगडी इमारत परिसरातील जिल्हा परिषदेच्या ऊर्दु शाळेची दुरवस्था झाली असून तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात दुध भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(६६) * ३५०६ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रकाश बिनसाळे, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८५० ला दिनांक ०८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालवणी, चारकोप व धारावी झोपडपटटी भागात तसेच पूणे शहरात अन्न व औषध प्रशासनाने दुध व तूप भेसळ प्रकरणात कारवाई केल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव, कोल्हापूर, पुणे तसेच मुंबई-ठाणे, परिसरातील दुधाचे नमुने तपासल्यानंतर पुणे येथे दुध व तूपाचे १७ नमूने तसेच राज्याच्या विविध भागातून आणलेल्या दुधाच्या ९५ नमूनांपैकी १० नमूने कमी दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्राहकांना सुरक्षित व दर्जेदार दूध व तुप उपलब्ध करुन देण्यासंदर्भात व दूध भेसळीला प्रतिबंध करण्याबाबत तसेच दुध भेसळ करण्याऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ मधील तरतुदींनुसार आयुक्त, अन्न सुरक्षा यांचेकडून अन्न भेसळीबाबतची माहिती घेणे, धाडी टाकणे, तपासण्या करणे, दोषींवर दंडात्मक/जप्तीची कारवाई करणे, गंभीर गुन्ह्यांबाबत एफआयआर दाखल करुन पोलिस तपास करणे इत्यादी सर्व प्रकारच्या आवश्यक उपाययोजना/कारवाया वेळोवेळी करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देवगड-जामसंडेसाठी नवीन नळपाणी पुरवठा योजनेबाबत**

**(६७) * ४४६१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगड प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेची मुदत संपून १० वर्षे झालेली असून देवगड-जामसंडे व परिसरात भागात दिवसे दिवस वाढीस लागलेल्या लोकसंख्येमुळे पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या लक्षात घेऊन देवगड-जामसंडेसाठी नवीन नळपाणी पुरवठा योजनेचा सुमारे ३२ कोटीचा एक प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) सदरहू प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,

(४) अद्यापी या प्रस्तावास शासनाची मंजूर मिळाली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) व (२) होय हे खरे आहे.

देवगड व जामसंडे गावांतील उन्हाळ्यातील तिव्र पाणीटंचाई विचारात घेता, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत या गावांसाठी रु. ३०.४६ कोटह ढोबळ खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रके व आराखड्यांचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. पियाळी नदीवर वळीवंडे देसाईवाडी येथे शीर्षकामे प्रस्तावित आहेत. हा उद्‌भव धरुन प्रकल्पित वर्ष सन २०२९ करिता लोकसंख्या २८३६५ साठी दरडोई प्रतिदीनी ७० लिटर इतका पाणीपुरवठा करणारी (एकूण २.५२ द.ल.ली.) योजना आखण्यात आली आहे.

(३) नाही

(४) देवगड व जामसंडे या गावासाठी दिनांक १५/०५/२०१२ रोजी नगर पंचायत स्थापन करण्याची उद्‌ घोषणा नगर विकास विभागामार्फत प्रसिध्द झाली आहे. त्यानुसार देवगड व जामसंडे या ग्रामपंचायती आता देवगड-जामसंडे, नगरपंचायत या नावाने गठीत होणार आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल हा कार्यक्रम ग्रामीण भागापुरता मर्यादीत असल्याने या अंतर्गत केवळ ग्रामीण भागातील गांवे/वाड्या/वस्त्यांकरीता निधी अनुज्ञेय केला जातो. त्यामुळे नागरी क्षेत्रासाठी किंवा नगरपंचायत क्षेत्र घोषित झालेले क्षेत्रासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यकमांतर्गत पाणीपुरवठा योजनांना मंजुरी देता येत नाही.

-----------------

## राज्यातील बीएड, बीपीएल व एमएड अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची नियुक्ती करण्याबाबत

**(६८) * ५१४७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बीएड, बीपीएल व एमएड अभ्यासक्रमाची महाविद्यालये बंद पडण्याच्या मार्गावर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एनसीटीई हा अभ्यासक्रम एक वर्षाऐवजी दोन वर्षाचा केल्याने संस्था चालकांसमोर महाविद्यालये चालविणे कठीण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांमध्ये मान्यताप्राप्त पात्रधारक प्राचार्य व प्राध्यापकांची नियुक्तीच करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अनेक महाविद्यालये बंद पडण्याची भिती व्यक्त होत असल्यामुळे शासन यावर कोणती कार्यवाही करणार ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कल्याण (ता.जि.सोलापूर) या ग्रामपंचायतीच्या राष्ट्रीय पेयजल योजनेचं काम अपूर्ण असल्याबाबत

**(६९) * ४९३१ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कल्याण (ता.जि.सोलापूर) या ग्रामपंचायतीमध्ये मागील वर्षापूर्वी राष्ट्रीय पेयजल योजनेस ४८ लाख रुपयाची मिळूनही सदर योजनेचे काम अद्याप न केल्याने गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार राष्ट्रीय पेयजल योजना तातडीने पूर्ण करणेबाबत व योजनेचे काम न करण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर योजना तातडीने पूर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही. सोलापूर जिल्ह्यात मौजे कल्याण या नावाचे गाव नाही. तथापि, सोलापूर जिल्ह्यात कळमण या नावाचे गाव असून तेथे राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत घेतलेल्या योजनेतून पाणीपुरवठा सुरु असल्याने सध्या पाणी टंचाई नाही.

(२) व (३) कळमण गावामध्ये नळ पाणीपुरवठा योजनेमधून पाणी पुरवठा सुरु आहे. त्यामुळे चौकशी अथवा कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर योजनेतील वितरण नलिका व किरकोळ कामे वगळता इतर कामे पूर्ण करण्यात आली आहेत. दि. २२ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयानुसार कळमण गाव अपेक्षित हागणदारी मुक्त झाले नसल्याने निधी मागणीचा तिसरा हप्ता तुर्तास वितरित करता येत नाही. त्यामुळे योजना आहे त्या स्थितीत आर्थिकदृष्टया अंतिम करण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावर करण्यात येत आहे.

-----------------

**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर येथील इमारत बांधकामाच्या प्रस्तावाची फाईल शासनाकडे प्रलंबित असल्याबाबत**

**(७०) * २७५६ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी इमारत बांधकामाच्या प्रस्तावाची फाईल नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रलंबित असलेला प्रस्ताव त्वरीत निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) नाही.

तथापि विनामुल्य /अल्प दराने नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडून जागा उपलब्ध करणे या संदर्भात नगरविकास विभागासमवेत विचारविनियम सुरु आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील मुख्याध्यापकाची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(७१) * ४४२७ श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या ४९ अनुदानित, ९४ विना अनुदानित अशा एकूण १४३ माध्यमिक शाळांपैकी १०५ पेक्षा अधिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त असून ती त्वरीत भरण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.शालेय शिक्षण मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त मुख्याध्यापकांची पदे त्वरीत भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) १४३ शाळांपैकी १०५ पेक्षा अधिक शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त आहेत.

अनुदानित असलेल्या ४९ शाळांमधील ३९ रिक्त पदे जुलै २०१३ मध्ये पदोन्नतीने भरल्यानंतर शिक्षक संघटनेने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सद्य:स्थितीत २२ पदे रिक्त आहेत.

विनाअनुदानित असलेल्या ९४ शाळांमध्ये रिक्त असलेल्या मुख्याध्यापक पदांवर पात्रतेचे निकष विचारात घेऊन पदोन्नतीने रिक्त पदे भरण्याबाबत मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**धुळे जिल्हयातील राज्य चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेच्या विविध मागण्याबाबत**

**(७२) * ३२३५ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यात अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया विनाअट राबवावी, वैद्यकीय शिक्षण संशोधन संचालनालयांतर्गत जिल्हा रूग्णालयातील बदली कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे, आऊटसोर्सिंग बंद करावे यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य चतुर्थश्रेणी सरकारी कर्मचारी संघटनेने दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) यासंदर्भात संघटनेने जिल्हाधिकारी, धुळे यांना सादर केलेल्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मा.मुख्यमंत्री कार्यालयास पाठविण्यात आली आहे. सदर निवेदनातील या विभागाशी संबंधित मुद्यांबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

अ) अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया प्रचलित शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या निर्देशांनुसार करण्यात येते.

ब) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत कार्यरत बदली कर्मचा-यांना सेवेत नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधिन आहे.

क) स्वच्छताविषयक कामे बाह्यस्त्रोताद्वारे करण्याच्या निर्णयाची अद्यापपर्यंत प्रत्यक्षात अंमलबजावणी झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात उद्योगधंद्यामुळे होणा-या नद्यांचे प्रदुषण रोखण्याबाबत**

**(७३) * ४१७३ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नद्या अखेरचा श्वास घेत असतांनाच उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी नदी प्रदुषण-संरक्षण धोरणच गुंडाळण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नदीपात्राच्या दोन्ही बाजूस २ कि.मी.अंतरात उद्योग उभारणीवर असलेले निर्बंध उठविण्याच्या मा.मुख्यमंत्री कार्यालयाने तयार केलेल्या प्रस्तावास शासनाच्या पर्यावरण विभागाने विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात उद्योगधंद्यामुळे होणा-या नद्यांचे प्रदुषण रोखण्याबाबत राज्य शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही किंवा उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) नदी काठावर उद्योगांचे स्थान नियमन धोरण कायद्यातील तरतुदीशी विसंगत असल्याने ते दिनांक ३/२/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात आले आहे.
(२) उद्योग विभागाच्या यासंदर्भातील प्रस्तावावर विधी व न्याय विभागाने दिलेल्या विधी सल्यानूसार या धोरणावर निर्णय घेण्यात आला आहे.
(३) उद्योगांमुळे होणारे नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येतात:-
अ) जल प्रदुषण कायदा व हवा प्रदुषण कायद्या अंतर्गत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगास अनूमती देतांना औद्योगिक सांडपाण्यावर १०० % प्रक्रिया करण्यासाठी अद्यावत सनियंत्रण यंत्रणा बसविणे बंधनकारक करण्यात येते.
ब) प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे उद्योगामध्ये पूनर्चक्रण व पूर्नरवापर करून शून्य निष्कासन करणे बंधनकारक करण्यात येते.
क) औद्योगिक वसाहतीधील नविन सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेमध्ये रिव्हर्स ऑस्मॉसिस (RO), सुधारित वेगवान बाष्पोत्सर्जन प्रणाली (HRTS) इत्यादी सारख्या आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर बंधनकारक करुन प्रक्रिया केलेले पाणी औद्योगिक वसाहतीत पूनर्वापर/पर्नचक्रणासाठी वापरणे बंधनकारक आहे. तसचे प्रक्रिया केलेले सांडपाणी नदी व जलस्त्रोतात सोडने अनूज्ञेय नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाडयात शिक्षणाच्या बाबतीत असलेली दुरवस्था दुर करण्याबाबत**

**(७४) * ४३९५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, डॉ.नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक ४९७७४ ला दिनांक ५ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात आणि विशेषत: मराठवाडयातील मुलांमध्ये वाचन व अध्ययन क्षमता फारच कमी असून १ ली ते ८ वी या इयत्तामध्ये ३८ टक्के मुलांना पहिलीची पुस्तके वाचता येत नसल्याचे व ७३.५ टक्के मुलांना साधी गणिते सोडविता येत नसून इंग्रजीसुध्दा वाचता येत नाही. असे वास्तव प्रथम या संस्थेच्या २०१४ या वर्षाच्या अहवालात निदर्शनास आल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) आकडेवारी तंतोतंत नाही पण भाव खरा आहे.

(२) शैक्षणिक गुणवत्ते संदर्भात कृतिगट स्थापन करण्याचीबाब विचाराधिन आहे.

(३) राज्यात शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी शासनातर्फे शिक्षका ना नामांकित संस्थांद्वारे प्रशिक्षण व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके पुरविणे इ. योजना राबविण्यात येतात तसेच माझी समृध्द शाळा सारख्या उपक्रमातून शासकीय शाळांची गुणवत्ता तपासण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात सी.आर्म मशीन बंद पडल्याबाबत

**(७५) * ५३९६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दोन महिन्यापासून अस्थिव्यंग किंवा अस्थिभंग झाल्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेले सी-आर्म मशिन बंद पडले असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मशिन दुरुस्त करुन येथे दाखल होणा-या रुग्णाला दिलासा देण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे अंशतः खरे आहे.

संस्थेतील सी-आर्म मशिन दि. ६.१.२०१५ रोजी तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले होते. तथापि पुरवठादार कंपनीकडून दुरुस्ती करण्यात येऊन दिनांक १२.२.२०१५ पासून सदरील यंत्र रुग्णसेवेत कार्यान्वित करण्यात आले आहे.

(२) यंत्र दुरुस्त करुन घेण्यात येऊन कार्यान्वित केली असल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केजी आणि पहिलीच्या वर्गात प्रवेश देण्यासाठी वयोमर्यादा निश्चित करणेबाबत**

**(७६) * ४७२७ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केजी आणि पहिलीच्या वर्गात प्रवेश देण्यासाठी कोणती वयोमर्यादा असावी, याबाबतचे परिपत्रक राज्य शासनाच्या शिक्षण मंत्रालयाकडून अद्याप प्रसिद्ध न केल्यामुळे शासन मान्यताप्राप्त शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रवेश रखडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनाअनुदानित खाजगी शाळांनी मात्र शासनाच्या निर्णयाची वाट न पाहता विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास सुरूवात केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये शासनाच्या निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील परिपत्रक अद्याप न काढण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,
(४) असल्यास, परिपत्रक काढण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) केजी आणि पहिलीच्या वर्गात प्रवेश देण्यासाठी दिनांक २१/१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये तसेच दिनांक २३/१/२०१५ च्या शुध्दीपत्रकान्वये वयोमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

-----------------

**राज्यातील प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ठोस कृति आराखडा तयार करण्याच्या निर्णयाबाबत**

**(७७) * ४९१८ श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ठोस कृति आराखडा तयार करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर, २०१४ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही. तथापि, २९/११/२०१४ रोजी वालधुनी नदीमध्ये रसायन सोडण्याच्या घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने ठोस कृती करण्याचे ठरले.
(२) वरील घटनेच्या संदर्भात संबंधीत यंत्रणा जसे की म.प्र.नि.मंडळ, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका व पोलीस यंत्रणा इत्यादींनी केलेल्या कारवाईचा आढावा दि.०१/१२/२०१४ रोजी अपर मुख्य सचिव पर्यावरण तसेच दि.०१/०१/२०१५ रोजी मा.मंत्री पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला.

सदर बैठकीमध्ये संबंधीत यंत्रणांना अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी समन्वयाने काम करुन संबंधीत दोषींवर कडक शासन होण्याच्या दृष्टीने कारवाई करण्याचे निर्देश होते.

त्यानुसार म.प्र.नि.मंडळाकडून दोषी आढळलेल्या मेसर्स हार्मोनी ऑरगॅनिक्स, कुरकुंभ या कारखान्याच्या उत्पादनावर बंदीची कारवाई करण्यात आली. तदनंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार मंडळाच्या स्तरावर सुनावनी देवून या कारखान्यास उत्पादन सुरू करण्यास सशर्त परवानगी दिली आहे. सदर घटने संदर्भात म.प्र.नि.मंडळाकडून अंबरनाथ पोलीस स्टेशनमध्ये FIR दाखल करण्यात आलेला आहे. तसेच मेसर्स हार्मोनी ऑरगॅनिक्स यांच्यावर खटला दाखल करण्यात आला आहे. घटनेमध्ये सामील संशयीत टँकर चालक/मालक इत्यादिंना अटक करण्यात आली असून अंबरनाथ पोलिस शाखेत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सेवेत असताना मृत्यू झाल्यास शिक्षकांच्या कुटूंबियांस आर्थिक मदत देण्याबाबत**

**(७८) * ५२११ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवेत असताना मृत्यू झाल्यास शिक्षकांच्या कुटूंबियांस राज्याच्या शिक्षण विभागातर्फे सुमारे साठ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवेत असताना मृत्यू झालेल्या राज्यातील ६८५ शिक्षकांच्या कुटूंबियांना अद्याप आर्थिक मदत मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कुटूंबियांना तातडीने मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२), (३) व (४) निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**पुण्याच्या इंडियन लॉ. सोसायटीच्या लॉ. कॉलेज मध्ये फिल्म मेकर आनंद पटवर्धन डॉक्युमेंटरी फिल्म त्वरीत दाखविण्याबाबत**

**(७९) * ५३६१ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याच्या इंडियन लॉ. सोसायटीच्या लॉ. कॉलेज मध्ये फिल्म मेकर आनंद पटवर्धन यांची अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उत्कृष्ठ डॉक्युमेंटरी फिल्म्सचे पुरस्कार मिळालेली “राम के नाम” डॉक्युमेंटरी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमात दाखविण्यात येणार होती, तो कार्यक्रम रद्द करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) विद्यार्थ्यांच्या इच्छे प्रमाणे सदर डॉक्युमेंटरी फिल्म्स त्वरीत दाखविण्यासाठी शासन काय कारवाई करणार आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) कार्यक्रम आयोजित केलेला नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील खाजगी इग्रंजी माध्यमाच्या शाळामध्ये मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नियमबाह्यपणे कार्यरत असल्याबाबत

**(८०) * ५५३७ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कॅथेड्रल शाळेसह दि बॉम्बे सेंट मेरीज सोसायटी (आयसीएसई), ॲक्टिव्हिटी हायस्कुल, डायमंड ज्युबिली हायस्कुल, बॉम्बे स्कॉटिश हायस्कुल या शाळामध्ये ५८ वर्षापेक्षा जास्त वय असलेले मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी नियमबाह्यपणे कार्यरत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या शाळांमध्ये ५८ वर्षापेक्षा जास्त वय असलेले मुख्याध्यापक व शिक्षक-शिक्षकेतर नियमबाह्यपणे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) संबंधित शाळांवर नियमानुसार कारवाई सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयामध्ये रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

**(८१) * ५९०३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयामध्ये ६१७२ सहाय्यक प्राध्यापक व ५९५४ शिक्षकेत्तर कर्मचारी भरती करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिव, सह सचिवांची चर्चा झाली असून याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ.धनराज माने यांनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घोषित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ११६९ कला, विज्ञान, वाणिज्य, बी.एड व बी.पी.एड अशी पारंपारिक महाविद्यालये असून १ ऑक्टोबर, २०११ च्या आकडेवारी नुसार सदर महाविद्यालयामध्ये ६१७२ सहाय्यक प्राध्यापक व ५१५४ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात त्यांना काय आढळून आले व त्यानुसार सदर रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) पदे रिक्त आहेत हे खरे नाही. मात्र अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर पदांचा आढावा विचाराधीन आहे.
(३) सदरहू प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर तातडीने कार्यवाही करण्यात येईल.
(४) कार्यवाही सुरू असल्याने विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत**

**(८२) * ३७६२ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ८३३ ला दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित शाळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) यामध्ये वित्तीय बाब अंतर्भूत असल्यामुळे वित्त विभागाच्या मान्यतेची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कायम विना अनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द काढल्यानंतर त्यांचे मुल्यांकन करण्याबाबत**

**(८३) * २८८५ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम हा शब्द २० जुलै, २००९ मधील शासन निर्णयाद्वारे वगळण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कायम शब्द वगळण्यासाठी शासनाने राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मुल्यांकन केले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील शाळांचे मुल्यांकन करणेसाठी नेमलेल्या समितीचे स्वरुप काय होते व त्यांनी मुल्यांकनाकरिता वापरलेले निकष काय आहेत,

(४) मुल्यांकन प्रक्रियेत राज्यातील किती प्राथमिक अथवा माध्यमिक शाळा पात्र ठरल्या आहेत व पात्र शाळांना अनुदानित करण्याबाबत शासनाचे काय धोरण आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: हे खरे आहे, कनिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द हा दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ अन्वये काढण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३) याबाबत शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ अन्वये शाळांचे मुल्यांकन करण्यात येते.

(४) मूल्यांकन प्रक्रियेत राज्यातील एकूण ९१६ माध्यमिक शाळा वेगवेगळया शासन निर्णयान्वये अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार पात्र शाळांना वेतन अनुदान देण्यात येते.

-----------------

## सुरगाणा (जि.औरंगाबाद) या तालुक्यात झालेला धान्याचा अपहार

**(८४) * ५१८९ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरगाणा (जि.नाशिक) येथील शासकीय गोदामात रेशनच्या धान्याचा प्रत्यक्ष साठा न ठेवता गहू, तांदूळ व साखरेसह सुमारे ३ हजार मेट्रीक टन धान्याचा अपहार केल्याप्रकरणी गोदाम माल पुरवठा निरीक्षक, सुरगाणा यांच्यासह अन्य पाच जणांच्या विरोधात अपहारा प्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच धान्य गायब होण्याच्या प्रकारात अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांचा सहभाग असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पुढे संबंधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीश बापट :** (१) होय,

सुरगाणा (जि.नाशिक) येथील शासकीय गोदामातून ३०,६८२.१७ क्विं. अन्नधान्याचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले ओ. सदर प्रकरणी दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी पोलीस स्टेशन, सुरगाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर अपहारात प्रथमदर्शनी गोदामपाल, वाहतुक प्रतिनिधी, पुरवठा निरिक्षक, वाहतूक ठेकेदार व तहसिलदार यांचा सहभाग असल्याचे निदर्शनास आले आहे. तसचे प्रस्तुत करणी पोलीस तपास सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी अपहारात प्रथमदर्शनी सहभागी आढळून आलेले गोदामपाल, सुरगाणा, वाहतूक ठेकेदार व त्यातील भागीदार, वाहतूक प्रतिनिधी, नाशिक रोड/अंबड, पुरवठा निरीक्षक यांचे विरुध्द दिनांक २६ जानेवारी, २०१५ रोजी पोलीस स्टेशन, सुरगाणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस तपासात तहसिलदार, सुरगाणा यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अपहारास जबाबदार असणारे संबंधित गोदामपाल, वाहतूक प्रतिनिधी, पुरवठा निरीक्षक व तहसिलदार, सुरगाणा यांना निलंबित करण्यात आले असून त्यांच्या विभागीय चौकशीच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर अपहारात प्रथमदर्शनी सहभागी असलेले वाहतूक ठेकेदार मे.एस.एन.मंत्री यांचे कंत्राट निलंबित करण्यात आलेले असून सदर वाहतुक कंत्राटास दिलेली मुदतवाढ दि. ०६.०२.२०१५ पासून संपुष्टात आणलेली आहे. अपहारास प्रत्यक्ष जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांकडून अपहारित धान्याची रक्कम ईकॉनॉमिक कॉस्टने वसूल करण्याचे लेखी निर्देश जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शिक्षकांचे पगार ऑनलाईन करण्याबाबत**

**(८५) * ३३७० श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, डॉ.सुधीर तांबे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्या १०० टक्के अनुदानावर येवूनही त्या नॉन प्लॅनमध्ये न गेल्याने त्यावरील कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांना मासिक वेतन वेळेवर मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॉन प्लॅन झालेल्या शाळा व वर्ग तुकड्यांना नॉन प्लॅनमध्ये घेण्यासाठी तसेच शिक्षकांचे पगार ऑनलाईन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) अद्याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्लॅन शाळा व वर्ग तुकड्यांना नॉन प्लॅनमध्ये घेण्याकरिता नियोजन व वित्त विभागाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

-----------------

**राष्ट्रीय सुरक्षा दल निदेशकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(८६) * ३५४३ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय अनुशासन योजनेअंतर्गत सन १९६६ ते १९७६ या कालावधीत केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय सुरक्षा दल निदेशकांची नेमणूक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० मे, १९७२ रोजीच्या केंद्र शासनाच्या निर्णयानुसार ही योजना महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण व क्रिडा विभागाकडे हस्तांतरीत करण्यात येऊन दिनांक १ ऑगस्ट, १९७२ पासून सदर योजना तत्कालिन संचालक, क्रिडा व युवक सेवा यांच्या अधिपत्याखाली सुरू करण्यात येवून या कर्मचाऱ्यांना दिनांक १ नोव्हेंबर, १९७६ पासून राज्य शासनाच्या सेवेत समाविष्ट करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाकडून राज्य शासनाच्या सेवेत समाविष्ट झालेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन निश्चित करताना केंद्र शासनाकडील सेवा कालावधी विचारात न घेता त्यांची वेतन निश्चिती करून त्यांच्यावर अन्याय करण्यात आल्याच्या तक्रार निवेदने दिनांक ९ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास तसेच त्यानंतर माहे जानेवारी, २०१५ मध्ये मा.आयुक्त, क्रिडा, पुणे, मा.प्रधान सचिव, क्रिडा विभाग व मा.क्रिडा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याप्रकरणी निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुसार प्रकरणार्थिंना सुधारित वेतन श्रेणी लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) निवृत्त राष्ट्रीय सुदृढता दल निदेशकांना दिनांक १ जानेवारी, १९७३ पासून अपदवीधरांसाठी रु. ४४०-७५०/- व पदवीधरांसाठी रु.५५०-९००/- अशी सुधारित वेतश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी शासनाने यापुर्वीच दिनांक ५ जुलै, २०१२ च्या पत्रान्वये अमान्य केली आहे.

-----------------

**राज्यातील सर्व शाळांचे नॅकच्या धर्तीवर मुल्यांकन करणेबाबत**
**शासनाने घेतलेल्या निर्णयासंदर्भात**

**(८७) * ५२६३ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील महाविद्यालयांप्रमाणेच राज्यातील सर्व शाळांचे स्कुल एक्रेडेशन कौन्सिल (सॅक) द्वारे मुल्यांकन करून त्यांना श्रेणी देण्याचे राज्य शासनाने प्रस्तावित केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नॅकच्या धर्तीवर राज्यातील सर्व शाळांचे सॅकद्वारे मुल्यांकन करण्यासंबंधीच्या धोरणांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याची केव्हापासून अंमलबजावणी करण्यांत येणार आहे तसेच स्कुल एक्रेडेशन काऊन्सिल सुरू करण्यात आली आहे काय,

(३) अद्याप, या धोरणावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला नसल्यास शैक्षणिक गुणवत्तावाढीचे अनुषंगाने सदरील कार्यवाही केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) नॅशनल अ‍ॅसेसमेंट अँड अ‍ॅक्रेडिटिशेन कौन्सिल (नॅक) च्या धर्तीवर राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी स्टेट अ‍ॅसेसमेंट अ‍ॅन्ड अ‍ॅक्रेडिटिशेन कॉन्सिल (सॅक) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्या संदर्भात सॅक अधिनियम व असेसमेंट मॅन्यूल तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**एकलहरे औष्णिक विद्युत केंद्राकडून पर्यावरणासंबंधीच्या नियमांचे झालेले उल्लंघन**

**(८८) * ३४६९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ११५२ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकलहरे औष्णिक विद्युत केंद्राकडून पर्यावरणासंबंधीचे नियमांचे उल्लंघन झाल्यामुळे या केंद्रातून बाहेर पडणाऱ्या राखेच्या प्रदुषणामुळे परिसरातील जमीन नापिक झाल्या तसेच या परिसरातील विहीरीमध्ये रासायनिक द्रव्यांचा अंश आढळून आल्याबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी तक्रारी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच या केंद्राने पर्यावरणासंबंधीच्या आधिसुचनांचे उल्लंघन केल्यामुळे हरित न्यायालयाने गंभीर ताशेरे ओढल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रदुषणाकडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रदुषण रोखण्याबाबत शासनामार्फत कोणती उपाययोजना व कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशतः खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंण मंडळाकडून नासिक जिल्ह्यातील एकलहरे औष्णिक विदयुत केंद्रातील धुरांड्यामधून निघणां-या धुलीकणांची वेळोवेळी तपासणी केली जात असून पृथःकरण अहवालानुसार धुरांड्यातून निघणा-या धुलीकणांचे प्रमाण विहीत मर्यादेपेक्षा (१०० mg/Nm३) सातत्याने जास्त असल्याचे आढळून येते.

(२) दिनांक ३० ऑक्टोबर, २०१३ रोजी हरित न्यायालयाने (पश्चिम विभाग) नासिक प्लॉय असोसिएशन विरुध्द केंद्रिय वने व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार व इतर यांच्या अर्जावर सर्व प्रतिवादयांना सुचना देऊन अर्जदारास फॅलाय ॲश उत्पादन संबधिचे दस्तावेज सादर करण्याबाबत सूचित केले होते. तथापि सदर अर्जाच्या अनुषंगाने हरित न्यायालयाने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या आराखड्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आदेश देऊन सदरचा अर्ज निकाली काढला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) नासिक येथील एकलहरे औष्णिक विदुयत केंद्राने त्यांच्या प्रत्येक धुरांड्याकरीता हवा प्रदुषण नियंत्रणाकरीता इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसिपिटेटर हि यंत्रणा बसविलेली आहे. सदर उदयोगाची पहाणी केली असता धुरांड्यामधून निघणा-या धुलीकणांचे प्रमाण विहित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आल्याने मंडळाने औष्णिक विदुयत केंद्रातून होणा-या प्रदूषणाची तीव्रता कमी करण्याकरीता संयुक्त आराखडा राबविण्यास कळविले होते व त्यानुसार अंमलबजावणी सुरु आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उदयोगास दिलेल्या संमती पत्रामध्ये हवा प्रदूषण यंत्रणेत सुधारणा करण्याकरीता रु. १.२० कोटीची बँक हमी जमा करण्याची अट नमूद केली असून त्यातील काही कामे डिसेंबर, २०१३ पर्यंत करणे बंधनकारक केले होते. त्यानुसार उदयोगाने रु.१.२० कोटी बँक गॅरंटी म्हणून मंडळाकडे जमा केली आहे. परंतु संमती पत्रातील अटींचे उल्लंघन झाल्याने निदर्शनास आल्याने मंडळाने सदर उदयोगाची रु.५० लक्ष रुपयाची बँक हमी जप्त केली आहे. तसेच अध्यक्ष महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ कलम ५ नुसार अधिनियमांच्या अनुषंगाने दिनांक २८/१/२०१५ रोजी निर्देश देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हयातील वाघापूर येथील पुरंदर किल्ल्याचा विकास करण्याबाबत

**(८९) * ५०८७ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील वाघापूर येथील पुरंदर किल्ल्याच्या विकासासाठी कोट्यवधी रुपये खर्च करुनही येथील रस्त्याची दुरावस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व तदनुसार पुरंदर किल्ल्याच्या विकासासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) पुरंदर किल्ला हा राज्य संरक्षित स्मारक नाही. तो संरक्षण खात्याच्या अखत्यारीत येतो. सदर प्रश्नाबाबत जिल्हाधिकारी पुणे यांनी दिलेल्या माहितीनुसार हे अंशतः खरे आहे.

येथील रस्त्याची कामे सन २०१० अखेर पुर्ण झाली असून सदर रस्त्यावरुन संरक्षण विभागाची मोठ्या प्रमाणात वाहतूक चालू असल्यामुळे रस्ता खराब झाला आहे.
(२) जिल्हाधिकारी पुणे यांनी पाहणी केली आहे.
(३) पुरंदर किल्ल्यात मोठ्या प्रमाणात कामे सुरू असल्यामुळे जड वाहतूकीचे प्रमाण जास्त असल्यामुळे रस्ता खराब झालेल्या लांबीमध्ये संरक्षण विभागातर्फे मजबुतीकरण व डांबरीकरणाची कामे प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अतिरिक्त प्राध्यापकांचे समायोजन करण्याबाबत**

**(९०) * ३८८५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिरिक्त ठरलेल्या प्राध्यापकांच्या समायोजनात गैरप्रकार झाल्यामुळे उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या सहसंचालकांवर आरोपांची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात प्रहार विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षांनी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहसंचालक, उच्च आणि तंत्रशिक्षण यांच्यावर केलेल्या आरोपांचे स्वरुप काय आहे,
(३) शासनाने या आरोपांची दखल घेऊन कारवाई करण्यासाठी वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे काय ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे. अध्यक्ष, प्रहार विद्यार्थी संघटना यांच्याकडुन दिनांक २९.०१.२०१५ च्या निवेदनाद्वारे सह संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई यांच्या विरुध्द तक्रार प्राप्त झाली आहे.
(२) सदर तक्रारीत अपात्र (बिगर नेटसेट) अधिव्याखात्याचे समावेशन केल्याबाबतची बाब उपस्थित करण्यात आली आहे.
(३) शासन निर्णय दिनांक ०८.९.२०१० अन्वये नेट - सेट नसलेल्या अधिव्याखत्यांना दि.३१.१२.२०११ पर्यंत नेट- सेट उत्तीर्ण होण्याची संधी देण्यात आली होती. सदर निर्णयातील परिच्छेद ११ मध्ये दि.३१.१२.२०११ नंतर महाविद्यालये असंलग्नीकरण करण्याची कार्यवाही संबंधीत विद्यापीठाने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, सदर तरतुदीस दि. २०.१२.२०११ च्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात असल्याने बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांच्या सेवा पुढे सुरु ठेवण्यात आल्या आहेत. सदरची कार्यवाही शासन निर्णयातील तरतूदीनूसार करण्यात आलयाने कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्याची काळ्या बाजारात होत असलेली विक्री

**(९१) * ५८७८ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दारव्हा (जि.यवतमाळ) तालुक्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्याची काळ्या बाजारात विक्री झाल्याचे माहे डिसेंबर, २०१४ च्या तिस-या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अन्नधान्याचा काळा बाजार करणा-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या रेडीओथेरेपी विभागात कर्करुग्णांची मोठया प्रमाणात झालेली नोंदणी

**(९२) * ५१६३ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या रेडीओथेरेपी विभागात ८ हजार १५२ कर्करुग्णांची नोंदणी झाली असून त्यापैकी १६७ रुग्णाचा मृत्यू झाल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्करोगावर कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या रेडिओथेरपी विभागात कर्करोगग्रस्त रुग्णांवर उपचार करण्यात येतात. सन २०१४ मध्ये एकुण २०८६ कर्करुग्णांची नोंदणी झाली असून, त्यापैकी एकुण ५३ रुग्णांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे.

(२) व (३) होय,

कर्करोग उपचाराबाबत प्रभावी उपाययोजना होणेकरिता राज्यस्तरीय कर्करोग संस्था /स्वतंत्र टर्शरी कॅन्सर केअर सुविधा स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, वर्धा यांच्या चौकशीबाबत**

**(९३) * २७६५ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यात २ मे, २०१२ च्या शासन निर्णयापूर्वी पूर्व परवानगी घेऊन भरती प्रक्रिया पूर्ण केलेल्या ५४ शिक्षकांची वैयक्तिक मान्यता प्रकरणे निकाली न काढता जाणीवपूर्वक प्रलंबित ठेऊन शिक्षणाधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद, वर्धा यांनी पत्र क्र. २०४०, दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ अन्वये शासनाकडे परवानगी (मार्गदर्शन) मागून वेळकाढू धोरण अवलंबिले आणि ५४ शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आणली, हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक ३१ ऑक्टोबर व दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी मा.शिक्षणमंत्र्यांना पत्र पाठवून शिक्षणाधिकारी श्री.संजय डोर्लीकर यांच्या निलंबनाची मागणी करुन चौकशी करण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, वर्धा यांनी दिनांक २८.१.२०१५ ते २.२.२०१५ या कालावधीत मान्यता शिबीराचे आयोजन करुन वैयक्तिक मान्यता प्रकरणे निकाली काढली आहेत.

-----------------

**मुंबई शहरातील प्रदूषणाचे प्रमाण रोखण्याबाबत**

**(९४) * ४४३८ श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.माणिकराव ठाकरे, डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत औद्योगिक कारखाने आणि वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे वायुप्रदुषण दिवसेंदिवस वाढत असून वरळी, वान्द्रे, सायन भागातील मुंबईकरांच्या आरोग्याला सर्वाधिक धोका असल्याचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांनुसार माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहरातील प्रदूषणाचे प्रमाण रोखण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येणार आहे,

(४) अद्याप, याबाबत उपाययोजना केली नसल्यास त्यामागील विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील वाढत्या शहरीकरणामुळे बहुतांशी उद्योग नजदीकच्या ठाणे व रायगड जिल्ह्यात स्थलांतरीत झालेले आहेत. मुंबई शहर व विकास प्राधिकरण यांचे १९९३ च्या धोरणानुसार मुंबई शहर व सभोवतालच्या परिसरात प्रदुषणकारी उद्योगांच्या उभारणीवर बंदी घालण्यात आली आहे. मुंबईतील वाढत्या जागेच्या ठिकाणी व औद्योगिक प्रक्रियेतील रसायनांचा वापर इ.बाबींमुळे बहुतांशी उद्योग बंद झालेले आहेत वा मुंबई बाहेर स्थलांतरित झाले आहेत.

(२) मुंबईतील जागेच्या कमतरतेमुळे मुंबई व सभोवतालच्या परिसरात गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या असून अस्तित्वातील वाहनांची संख्या, वाढणारी वाहतूक कोंडी, पायाभूत बांधकाम प्रकल्प यामुळे मुंबई व सभोवतालच्या परिसरात वातावरणीय हवेची गुणवत्ता खालावण्याचे मुख्य कारण असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पथापि, मुंबईकरांच्या आरोग्याला धोका असल्याबाबतचा अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेला नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी उद्योगांची व हवा प्रदुषण नियंत्रणेची पाहणी केली जाते व काही त्रुटी आढळल्यास मंडळाकडून हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) कायदा-१९८१ अंतर्गत कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विविध संस्थानी व्यायामशाळा इमारत बांधण्याच्या नावाखाली कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(९५) * ३२४२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील विविध संस्थानी व्यायामशाळा इमारत बांधण्याच्या नावाखाली कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार करण्यात आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या गैरव्यवहारात दोषी आढळून येणाऱ्या संस्थावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) या प्रकरणी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्यामार्फत संबंधित संस्थांची तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**औरंगाबाद घाटी रुग्णालयात न्युरोसर्जन व कार्डीओलॉजी पदे भरण्याबाबत**

**(९६) * ५७१४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६९ ला दिनांक १६ डिसेंबर,२०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद तसेच उत्तर महाराष्ट्र, विदर्भ तसेच संपूर्ण मराठवाड्यातील गोरगरीब जनतेसाठी अत्यंत उपयोगी व महत्वपूर्ण ठरणाऱ्या घाटी शासकीय रुग्णालयात न्युरोसर्जन व कार्डीओलॉजी पदे दोन वर्षापासून रिक्त असल्याने गोरगरीब रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही पूर्ण झाली आहे हे खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) सदर पदे नामनिर्देशनाने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिक्षणसेवक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत**

**(९७) * ५४०३ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने शिक्षक, शिक्षणसेवक व शिक्षिकेत्तर कर्मचा-यांना दिनांक २१ नोव्हेंबर, २०१० रोजी शासन निर्णय काढून दिनांक १ नोव्हेंबर, २००५ मध्ये नंतर लागलेल्या जुनी पेन्शन योजना (१९८२-८४) रद्द करुन परिभाषित अंशदान पेन्शन डी.सी.पी.एस. योजना लागू केल्यामुळे हजारो शिक्षकांवर अन्याय झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० पूर्वी सेवेत लागलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना १९८२-८४ लागू करणार आहे काय,

(३) याबाबत शासनाने धोरण काय आहे व याबाबतीत शासनाने अन्यायग्रस्त शिक्षकांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावर दि. १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना दि. १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य करण्यात आलेली आहे. सदर योजना, ज्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना [महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ आणि महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू आहे, अशा मान्यता व अनुदान प्राप्त शैक्षणिक संस्था इ.च्या सेवेमध्ये दि. १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू आहे.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दि.२९ नोव्हेंबर, २०१० नुसार नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच अध्यापक विद्यालयातील १००% अनुदानित पदावर दि.१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना (१९८२-८४) लागू होत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**क्रिडा पुरस्कारासाठी क्रिडा धारकाची संख्या वाढविण्याबाबत**

**(९८) * ५९०५ श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **क्रिडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात क्रिडा व युवक सेवा संचालनालय पुणेतर्फे जिल्हास्तरावर अत्युच्च कामगिरी करणा-या खेळाडू मार्गदर्शक व संघटनांना दरवर्षी दिल्या जाणा-या जिल्हा क्रिडा पुरस्कारासाठी यवतमाळ जिल्हयातून केवळ ११ अर्ज प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या तिस-या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात क्रिडा पुरस्कारासाठी क्रिडा धारकाची संख्या वाढावी म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) क्रिडा व युवक सेवा संघटनालयातर्फे दिल्या जाणा-या सन २०१४ च्या जिल्हा क्रिडा पुरस्कारासाठी यवतमाळ जिल्हयातून १३ अर्ज प्राप्त झाले होते हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा क्रिडा पुरस्काराबाबत यवतमाळ जिल्हयातील वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच विविध एकविध खेळांच्या क्रीडा संघटना व शाळा/महाविद्यालये यांच्या वेळोवेळी घेण्यात येणा-या सभेमध्ये, विविध क्रीडा स्पर्धाच्या उद्घाटन /बक्षिस समारंभामध्ये जिल्हा क्रीडा पुरस्काराची सविस्तर माहिती दिली जाते. या पुढेही या पुरस्कारांबाबत मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देवून पुरस्कारांसाठी जास्तीत जास्त प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यातील सर्व शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपालांचे दोन महिन्यांचे वेतन शिक्षण निरीक्षकामार्फत प्रलंबित असल्याबाबत**

**(९९) * ५२२८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांमधील अर्धवेळ ग्रंथपालांचे दोन महिन्यांचे वेतन शिक्षण निरीक्षकामार्फत प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रंथपालांचे दोन महिन्यांचे वेतन प्रलंबित ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय,

(३) तसेच ग्रंथपालांनी दैनंदिन भत्ते, नोकरीची हमी, पदोन्नती याबाबत वेळोवेळी आंदोलने केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील जवळजवळ १००० अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपालाचे निकष लागू करण्याबाबत तसेच समिती नेमून चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) होय.

(४) पुरेसा कार्यभार नसल्याचे आढळल्याने ग्रंथपालांच्या १०६७ अर्धवेळ पदांना पूर्णवेळ पदात रुपांतरित करण्यात येऊ नये असा शासनाने निर्णय घेतला आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.